सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. १७ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १३५ पाने : ८+४ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## दहीहंडीला गालबोट, आतापर्यंत ३२ मृत्यू



मुंबई : दहीहंडी उत्साहात साजरी होत असताना मुंबईत एक दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे दहीहंडी उत्सवालाच गालबोट लागले आहे. मुंबईत दहीहंडी उत्साहात साजरी होत असताना एकाचा मृत्यू झाला. महाराष्ट्र नगर मानखुर्द येथे दहीहंडीसाठी रश्शी बांधताना खाली पडून एकाचा मृत्यू झाला. जगमोहन शिवकिरन चौधरी (३२) असे मृताचे नाव आहे. दहीहंडी दरम्यान एकाचा मृत्यू झाला तर दुपारी तीन वाजेपर्यंत ३० जण जखमी झाले. मुंबई शहर भागात १८ गोविंदा जखमी झाले. यापैकी १२ जणांवर उपचार सुरू आहेत आणि सहा जणांना उपचार करुन घरी पाठवले आहेत. मुंबई पूर्व उपनगर भागात ६ गोविंदा जखमी झाले. यापैकी ३ जणांवर उपचार सुरू आहेत तर तीन जणांना उपचार करुन घरी पाठवले आहे. मुंबई पश्चिम उपनगर भागात ६ गोविंदा जखमी झाले. यापैकी एकावर उपचार सुरू आहेत आणि पाच जणांना उपचार करुन घरी पाठवले आहे. मुंबई महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार, दहीहंडी दरम्यान मुंबईत एकाचा मृत्यू झाला आणि दुपारी तीन वाजेपर्यंत ३० जण जखमी झाले. जखमींपैकी १६ जणांवर उपचार सुरू आहेत तर १४ जणांना उपचार करुन घरी पाठवले आहे. ठाणे जिल्ह्यात आदित्य रघुनाथ वर्मा या गोविंदाला डोक्याला दुखापत झाल्यामुळे तर कृष्णा मिठू स्वयन याला उजव्या हाताला दुखापत झाल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा येथे दाखल केले आहे.

# दहीहंडी द्वारे गोविंदा पथकांचा भारतीय सैन्य दलाच्या शौर्याला सलाम - मुख्यमंत्री



मुंबई: आज मुंबईत सर्वत्र दहीहंडीचा जल्लोष पाहायला मिळाला. यादरम्यान जय जवान आणि कोकण भवन दही हंडी पथकाने दहा थर लावत विश्वविक्रम केला. इतकेच नव्हे तर इतर प्रतिष्ठित दही हंडी पथकांनी देखील विशेष कामगिरी करत दरवर्षीप्रमाणे दहीहंडीचा उत्साह कायम ठेवला. यादरम्यान अनेकांनी उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक संदेश देखील दिला. संपूर्ण भारतीयांसाठी अभिमानास्पद असलेली आणि भारतीय लष्कराचे सामर्थ्य जगाला दाखवून देणाऱ्या 'ऑपरेशन सिंदूर' ची दखल देखील यादरम्यान घेतली गेली. घाटकोपर येथील लालबहादूर शास्त्री मार्गावर आयोजित राम कदम यांनी आयोजित केलेली दहीहंडी ही ऑपरेशन सिंदूरच्या शौर्याल सलाम करण्यासाठी उभारण्यात आली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. या प्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांनी कार्यक्रमाला उपस्थित सैन्य दलातील जवानांना भेटून संवाद साधला. या कार्यक्रमास सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, आमदार प्रवीण दरेकर, आ. राम कदम यांची देखील प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दहीहंडी उत्सवाच्या निमित्ताने शहर व उपनगरातील विविध कार्यक्रमांना भेट देऊन नागरिकांना शुभेच्छा दिल्या. यादरम्यान त्यांनी घाटकोपर येथील लालबहादूर शास्त्री मार्गावरील दहीहंडी उत्सवाला देखील हजेरी लावली होती, यादरम्यान त्यांनी ऑपरेशन सिंदूर द्वारे भारतीय सैन्य दलाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा निर्धार आणि विचार प्रत्यक्षात उतरवला. पाकिस्तानमधील दहशतवादी ठिकाणे नष्ट करून शत्रूला धडा शिकविला आणि आपल्या शौर्याची जगासमोर प्रचीती दिली आहे. आजच्या या दहीहंडी उत्सवातून गोविंदा पथकांनी सैन्य दलाच्या शौर्याला सलाम करण्याचे सुंदर काम केले आहे, असे गौरवोद्गार काढले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की,दहीहंडी उत्सवाला उपस्थित असलेल्या सैन्य दलातील जवानांना व त्यांच्या शौर्याला मी मनःपूर्वक सलाम करतो. सामाजिक उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून घाटकोपर येथील उत्सवाने जे कार्य केले आहे ते उल्लेखनीय आहे. गोविंदा पथकांनी उभारलेले थर सैन्य दलाच्या शौर्यासाठी अर्पण केले आहेत, ही एक प्रेरणादायी बाब आहे.

त्यांच्या हस्ते माजी सैन्य अधिकारी आनंद तिवारी यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सामाजिक कार्याबद्दल चेतन शाह व राजेश भीमसरे यांचा देखील गौरव करण्यात आला.

## राज्यात पाच दिवस अतिवृष्टीचा इशारा!

मुंबई: भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात पुढील काही दिवसांत म्हणजेच १६ ते २१ ऑगस्ट २०२५ दरम्यान अतिवृष्टीसह वादळी वाऱ्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कोकण किनारपट्टी, मध्य महाराष्ट्रातील घाट परिसर आणि मराठवाड्यात जोरदार पावसाची शक्यता असून, यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून करण्यात आले आहे.

हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार, कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या घाट परिसरात काही ठिकाणी अतिवृष्टीसह अत्यंत अतिवृष्टी होऊ शकते. मराठवाड्यातही काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पाऊस आणि ४० ते ५० किमी प्रतितास वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. या काळात वीज चमकणे आणि गडगडाट होण्याचाही अंदाज आहे. याव्यतिरिक्त, १६ ते २० ऑगस्ट दरम्यान कोकण किनारपट्टीवर ५० ते ६० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून, समुद्र खवळलेला राहील. त्यामुळे मच्छीमारांनी या काळात समुद्रात जाऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यातील अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून, कुंडलिका नदी, तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी आणि कोदवली नद्यांनी इशारा पातळी ओलांडली आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांनी पूरस्थितीपासून सुरक्षित राहण्यासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी, अशा सूचना जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीबद्दल माहिती देण्यासाठी 'सचेत' पद्वारे सतर्कतेचे संदेश पाठवले जात आहेत. आपत्ती व्यवस्थापनासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (छऊठऋ) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (डऊठऋ) यांना तयार राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

नागरिकांच्या मदतीसाठी मंत्रालयीन स्तरावरील राज्यस्तरीय आपत्कालीन कार्यकेंद्र २४७ सुरू आहे. मंत्रालय नियंत्रण कक्षासाठी फोन नं. ०२२-२२०२७९९० किंवा ०२२-२२७९४२२९ किंवा ०२२-२२०२३०३९ तसेच मोबाईल - ९३२१५८७१४३ उपलब्ध करून देण्यात आले असल्याचेही राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

## हुमायूं मकबऱ्यात भिंत कोसळून ५ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली : दिल्लीतील निजामुद्दीन भागात असलेल्या हुमायूं मकबऱ्यामध्ये भिंत कोसळल्याची घटना घडली आहे. या अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला असून मृतांमध्ये ३ महिला आणि २ पुरुष आहेत. या सर्वांना मलब्यातून बाहेर काढून एम्सच्या ट्रॉमा सेंटरमध्ये उपचारासाठी नेण्यात आले होते, मात्र तिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेत अनेक लोक जखमी देखील झाले आहेत.

दिल्लीच्या निजामुद्दीन भागात हुमायूंच्या मकबऱ्यामागे असलेल्या पत्तेशाह दरगाहचे दोन खोल्या कोसळल्या. सध्या घटनास्थळी एनडीआरएफ आणि अग्निशमन दलाच्या टीम्स उपस्थित आहेत. फायर ब्रिगेडने सांगितले की ५ ते ६ लोकांना आतापर्यंत मलब्यातून बाहेर काढून ट्रॉमा सेंटरला पाठवण्यात आले आहे. पोलीसांच्या माहितीनुसार, ही घटना दुपारी ३:४५ वाजता घडली.



ही दुर्घटना हुमायूं टॉम्बच्या मागील परिसरात असलेल्या दरगाहमध्ये घडली. मलब्यात १०-१२ लोक अडकल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. घटनेनंतर तत्काळ बचावकार्य सुरू करण्यात आले असून १२ लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे.

डीसीपी हेमंत तिवारी यांनी सांगितले, आत्ताच काही निश्चित सांगता येणार नाही. काही लोकांना बाहेर काढण्यात आले आहे. अजून किती लोक आत अडकले आहेत हे शोधण्यासाठी रेस्क्यू ऑपरेशन सुरू आहे.

दिल्ली अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनुसार, संध्याकाळी साडेचार वाजता गुंबदाचा भाग कोसळल्याची माहिती मिळाली.यानंतर तात्काळ जवान घटनास्थळी रवाना करण्यात आले. सध्या रेस्क्यू ऑपरेशन सुरू आहे.

## नागालँडचे राज्यपाल ला. गणेशन यांचे निधन



चेन्नई: नागालँडचे राज्यपाल ला. गणेशन यांचे शुक्रवारी (१५ ऑगस्ट, २०२५) रात्री चेन्नई येथील रुग्णालयात निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. काही दिवसांपूर्वी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते आणि त्यांच्यावर चेन्नईतील अपोलो रुग्णालयात उपचार सुरू होते. ८ ऑगस्ट रोजी त्यांच्या चेन्नई येथील निवासस्थानी ते पडले होते, ज्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. त्यानंतर त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, पण उपचारादरम्यान त्यांची प्रकृती ढासळत गेली आणि अखेर त्यांचे निधन झाले.

ला. गणेशन यांची १२ फेब्रुवारी २०२३ रोजी नागालँडचे २१ वे राज्यपाल म्हणून नियुक्ती झाली होती. त्यांनी २० फेब्रुवारी २०२३ रोजी पदभार स्वीकारला होता. यापूर्वी त्यांनी मणिपूर आणि पश्चिम बंगालचेही राज्यपाल म्हणून काम पाहिले होते. ते भाजपचे एक ज्येष्ठ नेते होते. त्यांच्या निधनाने राजकीय वर्तुळात शोककळा पसरली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इतर अनेक नेत्यांनी त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले आहे.




# मृत्युंजयी भारतासाठी हिंदुत्व प्रभावी हवे

### स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज; 'मृत्युंजय भारत' या अनुवादित पुस्तकाचे प्रकाशन

पुणे, दिनांक १५ ऑगस्ट: सामर्थ्यवान जगासाठी भारत समर्थ असावा आणि मृत्युंजय भारतासाठी हिंदुत्व प्रभावी हवे, असे प्रतिपादन अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी केले.



टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कूलच्या गणेश सभागृहात आयोजित 'मृत्युंजय भारत' या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य भैयाजी जोशी लिखित 'हमारा सांस्कृतिक चिंतन' या पुस्तकाचा आरती देवगावकर यांनी अनुवाद केला असून, मोरया प्रकाशनने ते प्रकाशित केले आहे. या वेळी कार्यक्रमाला रा.स्व. संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक प्रा. नाना जाधव आणि मोरया प्रकाशनाचे दिलीप महाजन उपस्थित होते.

भारताचा इतिहास हा पराभवाचा नसून संघर्षाचा आहे. आजही तो थांबलेला नसल्याचे गोविंददेव गिरीजी यांनी सांगितले. ते म्हणाले, देवत्वाची भावना आणि दृढ श्रद्धा हे भारताच्या मृत्युंजयाचे गमक आहे. भाषांचे आणि प्रांतांचे भेद आपण आज निर्माण केले आहेत. मात्र, तीर्थयात्रांमधून देशाचे एकत्व प्रकट होते. म्हणूनच हा देश अमेरिकेसारखा राज्यांचा संघ नसून, स्वयंभू चैतन्य असलेला देश आहे. विश्वाला सामर्थ्यवान करण्यासाठी भारत समर्थ असावा आणि भारताला समर्थ राहण्यासाठी हिंदू समर्थ असावा, असेही गोविंददेव गिरीजी यांनी सांगितले.

भैयाजी म्हणाले, ग्रंथ, मंदिरे आणि आचरणामुळे भारत संघर्षातही टिकला हे खरे आहे. पण त्यांच्या संपण्यामुळे भारत संपेल हा गैरसमज आहे. बहुकेंद्रीत समाज नियंत्रण असलेल्या भारताच्या विकासात साधूसंत, शूर महापुरुष, समाजसुधारक आणि सामान्यांचे मोठे योगदान आहे. समाजाला दोषमुक्त ठेवणाऱ्या समाजसुधारकांची एक मालिकाच आपल्याला लाभली आहे. हिंदू समाजच आपल्या संस्कृतीला नष्ट करू शकतो. म्हणूनच त्याला जागृत ठेवण्याचे काम हजारो वर्षांपासून चालू आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे त्याचे आजचे स्वरूप असल्याचेही भैयाजींनी सांगितले.

प्रा. नाना जाधव म्हणाले, भारतीय संस्कृती प्रवाहित ठेवण्यासाठी ऋषी, साधूसंत, युगदृष्टे, राष्ट्रपुरुष आणि समाजसुधारकांचे मोठे योगदान आहे. त्याची अभ्यासपूर्ण मांडणी या पुस्तकात करण्यात आली आहे. संघ शताब्दी वर्षात मूलभूत चिंतन असलेले पुस्तक प्रकाशित होत असल्याचा आनंद दिलीप महाजन यांनी व्यक्त केला. गौरी देव यांनी सूत्रसंचालन केले. कौस्तुभ देव यांनी आभार मानले.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## एमआयटी येथे आ. रमेश कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ ऑगस्ट -** भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने माईर्स एमआयटी वैद्यकीय शैक्षणीक संकुल, लातूर येथे शुक्रवारी सकाळी ९.१५ वाजता लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक तथा लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे आमदार रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेस आ. कराड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर मोठ्या उत्साहाच्या आणि राष्ट्रभक्तीच्या वातावरणात ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी लातूर एमआयटीचे परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड, वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. पी. जमादार, उपअधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा, प्रशासकीय व शैक्षणिक संचालिका डॉ. सरिता मंत्री, शैक्षणिक संचालक डॉ. चंद्रकांत शिरोळे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी एमआयटी परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड यांच्या हस्ते धन्वंतरी वैद्यकीय महाविद्यालय कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने सभासद कर्मचाऱ्यांच्या नव्वद टक्केहून अधिक गुण प्राप्त करणाऱ्या गुणवंत पाल्यांचा विविध पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आले. त्याचबरोबर रुग्णालय कक्षात उत्कृष्ट काम केल्याबद्दल परिचारिका श्रीमती आशा सोनवळे, मीरा बजगुडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच उत्कृष्ट कर्मचारी अध्यापक डॉ. भागवत शेळके, ग्रंथपाल चाफेकर यांचाही यथोचित सत्कार करून गौरव करण्यात आला. याप्रसंगी नर्सींग महाविद्यालयाचे प्राचार्य सरवननसेना, दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यतीश जोशी, उपप्राचार्य डॉ अमोल डोईफोडे, रूगणालय अधीक्षक डॉ. एकनाथ माले आदिंची उपस्थिती होती.



### संक्षिप्त वृत्त...

## तावरजा, तेरणा नदी काठावरील गावांना सतर्कतेचा इशारा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ ऑगस्ट -**

औसा तालुक्यातील तावरजा मध्यम प्रकल्पाचा पाणीसाठा ७३ टक्के झाला आहे. प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात पुढील दोन-तीन दिवसात पावसाची शक्यता असल्याने हा प्रकल्प निर्धारित धरण पातळीस पोहचण्याची शक्यता आहे. त्यानंतर प्रकल्पात येणारा येवा तावरजा नदीमार्गे सोडावा लागणार आहे. तसेच धाराशिव जिल्ह्यातील लोहारा तालुक्यातील माकणी येथील निम्न तेरणा धरणाचा पाणीसाठा ८५ टक्के झाला असून धरण निर्धारित धरण पातळी ओलांडण्याची शक्यता आहे. त्यानंतर धरणात येणारा येवा तेरणा नदीपात्रात सोडावा लागणार आहे. त्यामुळे तावरजा व तेरणा नदीकाठच्या गावांना, शेतकऱ्यांना, नदीकाठी वस्ती करुन राहिलेल्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

नागरिकांनी दुभती तसेच इतर जनावरे झाडाखाली, पाण्याच्या स्रोताजवळ, विद्युत खांबाजवळ बांधू नयेत. त्यांना सुरक्षित ठिकाणी बांधावे. आपल्या जनावरांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करुन स्वत: सुरक्षित ठिकाणचा आसरा घ्यावा. जलसाठ्याजवळ, नदीजवळ जावू नये. आपल्या मुलांना जलसाठ्यावर, नदीवर पोहण्यासाठी पाठवू नये. शाळा, महाविद्यालयातील शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांना याबाबत सूचित करावे. पुलावरुन, नाल्यावरुन पाणी वाहत असतांना कोणीही स्वत: किंवा वाहनासह पूल, नाला ओलांडण्याचा प्रयत्न करु नये. पूर प्रवण क्षेत्रात कोणीही जावू नये. पाऊस सुरु असतांना विजेच्या तारा, जुन्या इमारती कोसळण्याची शक्यता असते, तरी त्यापासून दूर राहण्याची खबरदारी घ्यावी, असे आवाहन लातूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणमार्फत करण्यात आले आहे.

## जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी ४४.६ मिलीमीटर पावसाची नोंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ ऑगस्ट -**

जिल्ह्यात १५ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी ४४.६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये शिरूर अनंतपाळ तालुक्यात सर्वाधिक ९५.२ मिलीमीटर, तर जळकोट तालुक्यात सर्वात कमी १८.८ मिलीमीटर पाऊस झाला आहे.

तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे- लातूर- ६८.१, औसा- ५४.२, अहमदपूर- २२.४, निलंगा- ५४.२, उदगीर- २६.६, चाकूर- २९.५, रेणापूर- २०.७, देवणी- ६२.८, शिरूर अनंतपाळ- ९५.२ आणि जळकोट- १२.५ मिलीमीटर.

## महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेतर्फे ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ ऑगस्ट -**

महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेच्या गुळमार्केट, लातूर येथील मुख्य कार्पोरेट कार्यालयात महाराष्ट्र नागरी बँकेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्याहस्ते ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहन करण्यात आले.

यावेळी एमएनएस बँकेचे उपाध्यक्ष एस.आर.मोरे, संचालक सूभाषअप्पा सूलगुडले, रविंद्र कांबळे, ॲड.बादाडे,ॲड.गंगाधर हामणे, प्रभारी विष्णू भूतडा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## संजय गांधी निराधार योजना तालुकास्तरीय समितीची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ ऑगस्ट -**

भाजपा नेते तथा लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार रेणापूर आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती जाहीर करण्यात आली असून रेणापूर तालुका अध्यक्षपदी सतीश आंबेकर यांची तर लातूर तालुका बन्सी भिसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यापासून अनेक जनहिताचे निर्णय घेतले जात आहेत. भाजपाचे नेते तथा लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी रेणापूर आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती जाहीर केली आहे.

# जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधणार : पालकमंत्री

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ ऑगस्ट -** जिल्ह्यात केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येत आहे. यामाध्यमातून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधून नागरिकांना गुणवत्तापूर्ण आणि कालबद्ध सेवा देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत, असे राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले.

भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित मुख्य शासकीय समारंभात पालकमंत्री श्री. भोसले बोलते होते. प्रारंभी पालकमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूलकुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांच्यासह स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक, वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, अधिकारी-कर्मचारी, पत्रकार बांधव, विद्यार्थी, पालक व नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्ह्यातील पायाभूत सुविधा बळकटीकरणाला गती देण्यात आली आहे. लातूर शहराच्या २९० कोटींच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेला मंजुरी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच केली आहे. तसेच जिल्ह्यात जलसंधारण आणि शेती क्षेत्राच्या विकासासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. मनरेगा अंतर्गत फळबाग लागवड योजना, जलयुक्त शिवार अभियान आणि गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार यासारख्या योजनांमुळे शेतीला बळ मिळत असल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी नमूद केले. जिल्ह्यातील शेतरस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमेत आतापर्यंत ८८२ किलोमीटर लांबीचे ६७८ रस्ते अतिक्रमणमुक्त झाले आहेत. लवकरच या रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.

ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्राच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. या प्रयत्नांची दखल राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली असून जिल्ह्यातील २७ आरोग्य संस्थांना राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानांकन मिळाले आहे. यासोबतच गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीतून सहाय्य मिळवून देण्यासाठी जिल्हास्तरावर कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. या कक्षामार्फत अवघ्या तीन महिन्यात १४३ रुग्णांना अर्थसहाय्य मिळवून देण्यात आल्याचे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या शंभर दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेत जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयाने उत्स्फूर्त सहभाग घेतला. आता या मोहिमेचा दीडशे दिवसांचा दुसरा टप्पा सुरु आहे. यामध्ये विकसित महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स सुधारणा, आणि सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा यांवर भर दिला जात आहे. याचाच एक भाग म्हणून लातूर जिल्हा परिषदेने व्हाटसअप चॅटबोट उपक्रम सुरु केला आहे. यामाध्यमातून नागरिकांना जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजना, ऑनलाईन अर्ज प्रक्रियेबाबत माहिती व्हाटसअपवर मिळेल. नागरिकांना गुणवत्तापूर्ण सेवा प्रदान केल्यामुळे उदगीर उपविभागीय कार्यालय, लातूर जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाला आयएसओ मानांकन मिळाले असल्याचे पालकमंत्री म्हणाले.

जवळपास ८० हजार शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० राबविण्यात येत आहे. या योजनेतून जिल्ह्यात ४७ सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले असून यामधून २३० मेगावॉट वीज निर्मिती होत आहे. त्यामुळे जवळपास ८८ हजार शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज मिळत असल्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान, आदिशक्ती अभियानात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.



## ‘त्या’कर्मचाऱ्यांचे वेतन थांबवावे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ ऑगस्ट -** बनावट वैयक्तिक मान्यता देवून शालार्थ आयडी दिलेल्या अपात्र कर्मचाऱ्यांचे वेतन थांबवून संबंधित संस्थाचालक, मुख्याध्यापक व शिक्षणाधिकारी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी मागणी एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे.

**शरद किनीकर यांची मागणी**

व्ही. एस. पँथर्सचे जिल्हाध्यक्ष शरद किणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हणले आहे की, २०१२ साली झालेल्या शासन निर्णयानुसार राज्यात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता देण्यास प्रतिबंध घालण्यात आले आहे. असे असताना श्री. महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थाद्वारा संचलित महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, देशिकेंद्र विद्यालय, नीळकंठेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व शंभुलिंग शिवाचार्य विद्यालयात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना बनावट कागदपत्राद्वारे व शासनाच्या अटी व नियमांची पूर्तता न करता वैयक्तिक मान्यता घेण्यात आलेली आहे.

विभागीय उपसंचालक कार्यालय, शिक्षणाधिकारी (माध्य.)जिल्हा परिषद व शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांच्याकडून शासनाच्या निर्णयाची पायमल्ली करून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता देवून शालार्थ आयडी देण्यात आली. त्यामूळे शासनाची कोट्यावधी रुपयांची फसवणूक झाली असून गुणवत्ताधारक व पवित्र पोर्टल मार्फत होणाऱ्या नियुक्त्यावर अन्याय झालेला आहे.

वैयक्तिक मान्यता घेतलेल्या अपात्र कर्मचाऱ्यांचे वेतन तत्काळ थांबवून संबंधितावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी किनीकर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली असून या निवेदनाच्या प्रती शिक्षणमंत्री, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव, शिक्षण सचिव आदिंना देण्यात आल्या आहेत.

## यांत्रिकी विभागाच्या मदतीने तात्काळ गेट दुरुस्ती करण्याच्या केल्या सूचना

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ ऑगस्ट -**

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री व महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवारी सकाळी बाभळगाव - भुसणी शिवारामधील भुसणी धरणाची पाहणी केली. या पाहणीनंतर शासनाच्या यांत्रिकी विभागाच्या मदतीने भुसनी धरणाचे गेट तात्काळ दुरुस्त करण्याच्या सूचना केल्या.

मागच्या दोन दिवसापासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे भुसनी धरणात पाण्याची अधिक आवक झाली असून नादुरूस्त गेटमुळे धरण क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या शेतात पाणी जाऊन त्यांच्या शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.

यासाठी सदरील धरणाचे सात पैकी चार नादुरुस्त असलेले गेट तात्काळ दुरुस्त करून घ्यावेत अशासूचना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुखयांनी यावेळी संबंधित विभागास केल्या.

यावेळी लातूर जलसंपदा विभागाच्या अधीक्षक अभियंता रूपाली ठोंबरे, कार्यकारी अभियंता अमर पाटील, उपअभियंता ओमप्रकाश थोरमोठे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव समद पटेल, प्रवीण सूर्यवंशी, बाभळगाव ग्रा.पं. उपसरपंच गोविंद देशमुख, भुसणीचे सरपंच वीरभद्र स्वामी, ग्रामसेवक नागनाथ काळे, तलाठी प्रगती अंधोरीकर, मंडळ अधिकारी चव्हाण, एन.एस.यु. आय.चे जिल्हाध्यक्ष रामराजे काळे, शेतकरी काशिनाथ मुक्तापुरे, पतंगे, राजकुमार मुक्तापुरे आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, शेतकरी उपस्थित होते.

आमदार अमित देशमुख यांनी औसा तालुक्यातील भुसनी येथील शेतकरी खंडू देवकते यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

## सूरज चव्हाणला बढती; ‘छावा’ने केले सुनील तटकरेंच्या प्रतिमेचे दहन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ ऑगस्ट -** ‘छावा’चे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांना जबर मारहाण करणारे अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पदावरून हकालपट्टी करण्यात आलेले सूरज चव्हाण यांना बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस म्हणून प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी नियुक्तीपत्र दिले आहे. याच्या निषेधार्थ गुरुवारी लातूरच्या राजीव गांधी चौकात छावा संघटनेच्यावतीने सुनील तटकरे यांच्या प्रतिमेला जोडे मारून त्यांच्या प्रतिमेचे दहन करण्यात आले.

विधिमंडळात रमी खेळणारे तत्कालीन कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घ्यावा, या मागणीचे निवेदन महिनाभरापूर्वी लातूरच्या शासकीय विश्रामगृहात सुनील तटकरे यांना देऊन बाहेर पडल्यानंतर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी विजयकुमार घाडगे यांना जबर मारहाण केली होती. त्यानंतर अजित पवार यांनी अशा प्रवृत्तीच्या कार्यकर्त्याला राष्ट्रवादीत थारा नाही म्हणून सूरज चव्हाण यांची पदावरून हकालपट्टी केली होती. त्यांना पुन्हा पक्षात पद देणे अपेक्षीत नसताना बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सूरज चव्हाण यांची पक्षाचे सरचिटणीस म्हणून नियुक्ती केली. हा प्रकार म्हणजे सूरज चव्हाण यास शेतकऱ्याच्या पोराला मारहाण केल्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसने बक्षीस दिले आहे, असे सांगत छावा संघटनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी गुरुवारी सुनील तटकरे यांच्या प्रतिमेला जोडे मारून त्यांच्या प्रतिमेचे दहन केले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सुनील तटकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या विरोधात घोषणाबाजी केली.

# लोकनेत्याला विलासबागेत आदरांजली

### पालकमंत्री भोसले, जरांगे पाटलांसह हजारोंचे अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ ऑगस्ट -** माजी मुख्यमंत्री तथा माजी केंद्रीय मंत्री लोकनेते विलासराव देशमुख यांच्या १३ व्या स्मृतिदिनानिमित्त गुरुवारी बाभळगाव येथील विलासबागेत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या स्मृतिस्थळाला पुष्पहार अर्पण करून सुमनांजली वाहण्यात आली. यावेळी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मराठा आरक्षण योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्यासह हजारोंनी लोकनेत्यास अभिवादन केले.

यावेळी सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, विलास साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई देशमुख, माजी मंत्री आमदार संजय बनसोडे, माजी मंत्री आमदार अमित देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे, लातूर जिल्हा बँकेचे चेअरमन माजी आमदार धीरज देशमुख, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर, माजी आमदार उल्हास पवार, नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, महापालिका आयुक्त मानसी मीना यांची प्रमुख उपस्थिती होती.

लातूरचे सुपुत्र लोकनेते विलासराव देशमुख यांनी आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात राज्याच्या हितासाठी कार्य केले. राजकीय, सामाजिक, कृषी, आर्थिक, संस्थात्मक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यशवंतराव चव्हाण यांचा वारसा दाखविणारे आहे. त्यामुळे काँग्रेससह सर्वच पक्षाचे नेते, पदाधिकारी यांचा लोकनेते विलासराव देशमुख यांचा स्नेह होता.

गुरुवारी १३व्यास्मृतिदिनानिमित्त लोकनेते विलासराव देशमुख यांना तालुक्यातील बाभळगाव येथील विलासबागेत अभिवादन करण्यासाठी गुरुवारी सकाळपासूनच लाडक्या लोकनेत्यास अभिवादन करण्यासाठी चाहत्यांनी स्मृतीस्थळावर गर्दी केली होती.



यानिमित्त सकाळी ९ वाजता जयपूर अत्रौली घराण्याचे प्रख्यात शास्त्रीय गायक पंडित रघुनंदन पणशीकर यांचा भक्ती संगीत आणि ‘संतवाणी’चा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सूत्रसंचालन बाळकृष्ण धायगुडे यांनी केले. यावेळी लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, औसा-रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार सौदागर तांदळे, मांजरा साखर कारखान्याचे संचालक श्रीशैल उटगे, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अशोक पाटील निलंगेकर, जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव, प्राचार्य डी. एन. केंद्रे, ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी, ॲड. समद पटेल, प्रवीण सूर्यवंशी यांच्यासह विविध पक्ष, संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हजारो नागरिकांनी विलासराव देशमुख यांना आदरांजली अर्पण केली.

## केशवराज’मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ ऑगस्ट -**येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि. १५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न करण्यात आला.

प्रथम केशवराज शैक्षणिक संकुल, स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शैलेश कुलकर्णी यांच्या हस्ते सकाळी विद्यालयात ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर महावृक्षलागवड अभियानांतर्गत मान्यवरांच्या हस्ते शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यानंतर शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लातूर विभाग संघचालक संजयजी अग्रवाल तसेच केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, स्थानिक समन्वय समिती कार्यवाह शैलेश कुलकर्णी, माध्यमिक शालेय समिती सदस्य नरेंद्र पाठक, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा विद्यालयाचे उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता व भारत माता यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे संजयजी अग्रवाल असे म्हणाले, की खऱ्या अर्थाने देशाला गुणवंत विद्यार्थी देण्याचे कार्य शाळा करते. मुख्याध्यापक बाळासाहेब केंद्रे यांनी अध्यक्षीय समारोप केला.

## लिटल चॅम्प्स इंग्लिश स्कूल फर्दापूर येथे बालगोपाल दहीहंडी उत्सवात पार पडली



फर्दापूर दि १६ लिटल चॅम्प्स इंग्लिश स्कूल फर्दापूर येथे कृष्ण जन्माष्टमी निमित्त शाळेत दहीहंडी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी शाळेतील छोटे विद्यार्थी यांनी राधा कृष्ण याची वेशभूषा करून आले आणि त्यानंतर शाळेच्या मैदानात हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षिका ही उपस्थित होत्या

## भाविकांची मोठी गर्दी जय भद्राच्या गजराने खुलताबाद नगरी दुमदुमली

खुलताबाद प्रतिनिधी : भाविकांच्या नवसाला पावणारा भद्रा मारुती महाराष्ट्रातील एकमेव निद्रा अवस्थेत असलेल्या स्थळ म्हणून प्रसिद्ध असून या ठिकाणी शुक्रवारी संध्याकाळपासूनच मोठ्या संख्येने भाविक राज्यभरातून येण्यास सुरुवात होते. श्रावणच्या शेवटच्या व चौथा शनिवारी असल्याने अनेक भाविक च्या दिंड्या दाखल होतात प्रमुख्याने छत्रपती संभाजी नगर. जालना अहिल्यानगर शिर्डी .नाशिक. शहादा .चाळीसगाव.सह अनेक ठिकाणचे भाविक भक्त येतात आलेल्या भाविकांसाठी संस्थांच्या वतीने महाप्रसाद फिल्टर पाणी ची



व्यवस्था केली असून अभिषेक व्ही आय पी दर्शन बंद करून येणाऱ्या सर्व भाविकांचे दर्शन लवकर व्हावे यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या सर्व नियमाचे पालन करून सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्याची माहिती संस्थांचे वतीने महाराष्ट्र राज्याचे मंत्री अतुल मोरेश्वर सावे मा. खा. चंद्रकांत खैरे अध्यक्ष मिठू पाटील बारगळ जनसंपर्क अधिकारी राजेंद्र जोंधळे यांच्या सह संस्थांच्या वतीने देण्यात आली आहे

## मंगरूळ मध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

सिल्लोड प्रतिनिधी - स्वातंत्र्यदिनानिमित्त मंगरूळ ग्रामपंचायत मध्ये स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला ग्रामपंचायत मंगरूळचे ध्वजारोहण सरपंच निवृत्ती केशव वर्पे यांनी केले तर सोसायटीचे ध्वजारोदन चेअरमन धुरपतराव पाटील खेळवणे यांनी केले तर जिल्हा परिषद शाळा मंगरूळ येथील ध्वजारोहण योगेश मस्के यांनी केल स्वातंत्र्य दिनानिमित्त गावात शालेय विद्यार्थ्यांची रॅली निघाली होती तसेच गावातील शेकडो नागरिक ध्वजारोहणासाठी ग्रामपंचायत येथे उपस्थित होते.

## नवग्रह प्रतिष्ठान मंडळाच्या अध्यक्षपदी धुत



पैठण दि १६ :- जय बजरंग नवग्रह प्रतिष्ठाण गणेश मंडळाची कार्यकारिणी नुकतीच गठीत करण्यात आली असून यात अध्यक्षपदी सर्वेश रघुनाथ धूत,उपाध्यक्ष ब्रिजेश पवन मैड सचिव प्रसाद विनोद बागले कोषाध्यक्ष कपिल कावसानकर,सचिन बजाज सहसचिव चैतन्य गोसावी,विघ्नेश बागले कार्याध्यक्ष मयूर लोहिया,आशिष नवगावकर स्वागताध्यक्ष मधुसुधन मुंदडा,शिवराज पारिख यांची वर्णी लागली आहे.

याप्रसंगी मनीष मेहता,देवांग भंडारी, महेश श्रीमाळी, यज्ञेश चक्रे, मयूर लोहिया,चैतन्य गोसावी, अभिषेक शिंदे, सुदर्शन सरोदे, ऋषिकेश खिस्ती, प्रतीक पारवे, धनंजय कावसानकर, कपिल काका कावसानकर, मधुसूदन मुंदडा, सचिन बजाज, विश्वास कावसानकर, गणेश लोळगे, गौरव तांगडे यशराज मगरे प्रज्वल होर्शीळ, जयेश शिंदे सह मंडळाचे जेष्ठ सदस्य तथा सल्लागार उपस्थित होते.

## जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे दहीहंडी उत्सव उत्साहात संपन्न

सोयगाव ,दि.१६ ऑगस्ट - सोयगाव केंद्रातील उपक्रमशील शाळा जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे सोयगाव तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे व सोयगाव केंद्राचे केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली गोपालकाला निमित्ताने तसेच आनंददायी शनिवार उपक्रमातर्गत शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांनी वैशाली पवार उपाध्यक्षा व्यवस्थापन समिती,मनिषा जेठे सदस्या व्यवस्थापन समिती यांच्या प्रमुख उपस्थितीत शाळेतील विद्यार्थ्यासाठी दहीहंडी चे आयोजन केले.यासाठी शालेय व्यवस्थापन समिती तसेच माता पालक संघाचे सहकार्य लाभले.यावेळी देवाश वावरे,रुद्र पवार,गौरव गायकवाड या विद्यार्थ्यानी श्रीकृष्णाची तर डिपल ठोबरे,गौरी खिरडकर,गौरी इगळे,पल्लवी सुरे,किरण जेठे या विद्यार्थीनीनी राधाची वेशभुषा धारण केली होती.सर्व बालगोपालानी दहीहंडीच्या गीतावर सुदर नृत्य करून नृत्याचा आनंद घेतला.बाल गोविंदानी दोन थर लावून राजू जाधव या बालगोविदाने दहीहंडी फोडली.यावेळी माता पालक संघाच्या सदस्या,पालक,शाळेचे माजी विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.दहीहंडी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,सहशिक्षक गोपाल चौधरी प्रशिक्षक शिक्षक शुभम देसले यांनी परिश्रम घेतले.



## अनिल गंगवाल यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी - उल्कानगरी येथील रहिवासी तथा एलआयसीचे माजी अधिकारी अनिल रतनलाल गंगवाल (६६) यांचे दिर्घ आजाराने दि. १५ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता निधन झाले. त्यांचा देहदान संध्याकाळी ६ वाजता एम.जी.एम हॉस्पिटलला करण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी, ४ भाऊ, ३ बहिणी असा परिवार आहे. एलआयसीच्या माजी महिला अधिकारी प्रिती गंगवाल यांचे पती व आर्किटेक्ट गगन गंगवाल यांचे ते वडील होते.

## सांडू काटकर यांचे निधन



सिल्लोड प्रतिनिधी सांडू तुकाराम काटकर यांचे दिनांक १४ ऑगस्ट रोजी निधन झाले मृत्यू समयी त्यांचे वय ७५ वर्षाची होते गावातील आयुर्वेदिक डॉक्टर म्हणून त्यांची ख्याती होती त्यांच्या अंत्यसंस्काराला भाजपचे माजी नगरसेवक विष्णू काटकर तहसील मधील नायब तहसीलदार गवळीसाहेब व गावातील सरपंच निवृत्ती वरपे व गावातील असंख्य लोक हजर होते त्यांच्या पाश्चात चार मुले व दोन मुली नातवंडे असा मोठा परिवार आहे

# हिंदूंचे विश्वव्यापी संघटन उभारण्याचा निश्चय होऊन २९ ऑगस्ट १९६४ रोजी विश्व हिंदू परिषदेची स्थापना : संजय बारगजे

### विश्व हिंदू परिषदेचा ६१ वा वर्धापन दिन प्रांत कार्यालयात उत्साहात साजरा

छत्रपती संभाजीनगर - संपूर्ण भारतातील व विदेशातील सर्व हिंदूमध्ये भाषा क्षेत्र मत संप्रदाय या कारणाने निर्माण झालेले भेद मिटवून त्यांना एकात्मतेची अनुभूती करून देणे व एक अखंड व सुदृढ समाज निर्माण करून त्यामध्ये धर्म व संस्कृती संबंधी अभिमान निष्ठा व भक्ती उत्पन्न करणे याशिवाय हिंदू धर्मातील बहिष्कृत धर्मांतरित परंतु हिंदू जीवन पद्धती संबंधी आस्था असणाऱ्या बांधवांना हिंदू धर्मात पुन्हा आणणे व त्यांचे योग्य पुनर्वसन करणे यासाठी श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी २९ ऑगस्ट १९६४ ला मुंबई येथील स्वामी चिन्मयानंदजी च्या सांदिपणी आश्रमात विश्व हिंदू परिषदेच्या कार्याचा प्रारंभ झाला असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषद नैतिक मूल्य शिक्षण मुंबई क्षेत्र प्रमुख श्री संजय आप्पा बारगजे यांनी केले. विश्व हिंदू परिषदेतर्फे १६ ऑगस्ट रोजी खडकेश्वर छत्रपती संभाजीनगर येथील प्रांत कार्यालयात आयोजित वर्धापन दिन कार्यक्रमात बोलत होते



यावेळी व्यासपीठावर विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांत अध्यक्ष प्रा.श्री संजय गायकवाड उपाध्यक्ष सौ कुंदाताई अंदुरे उपस्थित होत्या

यावेळी बोलताना आप्पा पुढे म्हणाले विश्व हिंदू परिषदेच्या स्थापनेच्या वेळी स्वामी चिन्मयानंदजी मुंबई दादासाहेब आपटे,के एम मुंशी,मास्टर तारासिंह पंजाब, डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी कलकत्ता,हनुमान प्रसाद पोतदार, संत तुकडोजी महाराज,संत सुशील मुनी जी ,दलाई लामा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक पूजनीय गोळवलकर गुरुजी इत्यादी सह ४० महानुभाव या स्थापना कार्यक्रमात उपस्थित होते.

विविध ठिकाणी अखिल भारतीय स्तरावर आणि प्रांत स्तरावर झालेल्या हिंदू संमेलनात पूज्य साधुसंत महात्मे मठाधीश शंकराचार्य यांनी परिषदेचे कार्य सर्व हिंदू समाजापर्यंत पोहोचावे या दृष्टीने काही मार्गदर्शन सिद्धांत दिले होते हिंदव: सोदरा: सर्वे, न हिंदू पतितो भवेत, मम दीक्षा हिंदु रक्षा,मम मंत्र समानता असे सूत्रबद्ध विचार समाजापर्यंत पोहोचत होते याच अनुषंगाने पूज्य संतांच्या पदयात्रा हरिजन वस्त्या वनवासी क्षेत्रे झोपडपट्ट्या इत्यादी ठिकाणी सुरू झाल्या धर्मांतरण रोखण्यासाठी तसेच सर्व समाज बांधवांमध्ये धर्माविषयी श्रद्धा व भक्ती भाव वाढवण्यासाठी समष्टी भाव जागरण करण्यासाठी या पदयात्रांचा मोठा उपयोग होऊ लागला.

यावेळी संजय आप्पा बारगजे यांनी मागील ६१ वर्षाच्या उपलब्धतेचा अहवाल सर्वांसमोर मांडला ते म्हणाले विश्व हिंदू परिषदेने १९८४ साली पूजनीय संतांच्या नेतृत्वाखाली राम जन्मभूमी मुक्ती आंदोलनाला सुरुवात केली. देशातले हिंदुत्व जागृत झाले आणि त्याचा परिणाम म्हणून सहा डिसेंबर १९९२ ला बाबरी ढाच्या उध्वस्त झाला त्या ठिकाणी आता आंतरराष्ट्रीय स्तरावरचे भव्य राम मंदिर उभे राहिले आहे.

वर्धापन दिन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महानगर मंत्री अभिषेक कादी यांनी केले यावेळी मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे प्रांत प्रमुख राजीव जहागिरदार संभाजी भनगे गणेशराव सुरडकर सारंग जोशी महेश दोरवट पाटील अनंत जोशी मिलिंद कुलकर्णी सुभाष कुमावत निलेश कुलकर्णी ज्ञानदेव पाटील नंदाताई क्षीरसागर सह मोठ्या संख्येमध्ये कार्यकर्ते उपस्थित होते.

# एमजीएममध्ये अँटी-रॅगिंग जनजागृती सप्ताहास सुरूवात

छत्रपती संभाजीनगर, दि.१६ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डॉ.जी.वाय.पाथ्रीकर महाविद्यालयात मंगळवार, दिनांक १२ ऑगस्ट २०२५ ते सोमवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२५ दरम्यान अँटी-रॅगिंग जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्राप्ती देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून यात विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला आहे.



या सप्ताहात पहिल्या दिवशी रॅगिंग विरोधी प्रतिज्ञा विद्यार्थ्यांना देण्यात आली. दुसऱ्या दिवशी डिजिटल-पोस्टर, डिजिटल लोगो, रांगोळी काढून त्यातून जनजागृतीपर संदेश देण्यात आला. एनसीसी कॅडेटच्या विद्यार्थ्यांनी अँटी-रॅगिंग सुरक्षा व दक्षता या विषयी डिजिटल फ्लिम बनवून सहभाग नोंदवला. तसेच यावेळी अँटी-रॅगिंग पथनाट्य सादर करत विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून समकालीन काळामध्ये घडणाऱ्या घटनांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेस डॉ. कपिलेश मंगल, डॉ.संजय आझादे, डॉ.सतीश संकाये यांनी निरीक्षक म्हणून भूमिका पार पाडली.

अँटी-रॅगिंग या विषयावर माहिती सत्राचेही या दरम्यान आयोजन करण्यात आले होते. ड.रीना मानधनी यांनी 'झिरो टॉलरन्स टूरॅगिंग' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी अँटी-रॅगिंगविषयी युजीसी व एमजीएम विद्यापीठाची पॉलिसीविषयी व कायद्याविषयी माहिती दिली. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी अँटी-रॅगिंग कार्यक्रम समन्वयक, डॉ.बाली थोरात, डॉ. सारिका शेळके, डॉ.प्रतिभा भिसे, प्रा.अक्षय देशपांडे, प्रा.कोमल ओझा, डॉ. संदीप थोरात, प्रा.राजू साबळे, प्रा. शामल महाजन आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रिद्धी साळुंके व सिद्धी काळे यांनी केले. आभार महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.प्राप्ती देशमुख यांनी मानले.

# फारोळा ग्रामपंचायत येथे ध्वजारोहण उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १६ ऑगस्ट

पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा ग्रामपंचायत कार्यालय येथे सरपंच सलीम महमंद पठाण यांच्या हस्ते महात्मा गांधी, डॉ बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून ७९ वा स्वतंत्र दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. साजरा .यावेळी ग्रामपंचायत अधिकारी आशाताई तुपे,उपसरपंच शितल चाव्हरे,कमल गोरे,पल्लवी गोरे,सरला पोपळघट,विष्णू पोपळघट,तमिजाबी पठाण, इलियास पठाण,तंटामुक्ती समिती अध्यक्ष,शिक्षक वृंद, अंगणवाडी सेविका,मदतनीस,आशा ताई,आजी माजी पदाधिकारी,व मान्यवर ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ,मोठ्या संख्येने महिला व गावकरी आदींची उपस्थित होते.



# छत्रपती संभाजीनगरमध्ये 'वारसा सह्याद्रीचा' सांस्कृतिक महोत्सवाचे १८ ऑगस्टपासून आयोजन

### महाराष्ट्र, राजस्थानचे राज्यपाल, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती

प्रतिनिधी.छत्रपती संभाजीनगर

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूर यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगरमध्ये १८ आणि १९ ऑगस्ट रोजी 'वारसा सह्याद्रीचा' या सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या महोत्सवातून विविध राज्यांतील सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडेल. एमआईटी कॉलेजच्या मंथन हॉलमध्ये दोन्ही दिवशी सायंकाळी ७ वाजता महोत्सवाला सुरूवात होईल. त्यास विनामूल्य प्रवेश असेल.

'वारसा सह्याद्रीचा' सांस्कृतिक सोहळ्याला महाराष्ट्राचे इतर मागासवर्ग कल्याण, दुग्धविकास आणि अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री आशीष शेलार, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार विक्रम काळे , रमेश बोरनारे, राज्यसभेचे खासदार भागवत कराड, खासदार संदीपन भुमरे, कल्याण काळे, तसेच आमदार अब्दुल सत्तार, प्रशांत बंब, प्रदीप जयस्वाल, अनुराधा चव्हाण, संजना जाधव, विलास भुमरे, सतीश चव्हाण आणि, संजय केणेकर उपस्थित राहणार आहेत. यासोबतच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापलकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, तसेच जी. श्रीकांत, अंकित आणि प्रवीण पवार यांची कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती असेल.

या दोन दिवसीय सांस्कृतिक महोत्सवात सर्वसामान्यांना रसिकांना विनामूल्य प्रवेश असेल. १८ आणि १९ या दोन्ही दिवशी सायंकाळी ७ वाजता कार्यक्रमाला सुरूवात होईल, अशी माहिती राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबईचे संचालक विभीषण चवरे यांनी दिली. छत्रपती संभाजीनगरच्या सातारा परिसरातील एमआयटी परिसरातील मंथन हॉलमध्ये सांस्कृतिक महासंगमाच्या तयारीला जोरदार सुरुवात झाल्याचे पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूरचे कार्यक्रम अधिकारी हेमंत मेहता म्हणाले. 'वारसा सह्याद्रीचा' मध्ये राज्यासह देशभरातील नामांकित कलाकार कला सादर करतील. यासाठी विविध राज्यांतील लोककलाकार शहरात दाखल होण्यास सुरूवात झाली आहे. नृत्यदिग्दर्शक संतोष नायर आणि त्यांच्या चमूच्या मार्गदर्शनाखाली सादरीकरणाला अंतिम स्वरूप देत असल्याची माहिती पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूरचे संचालक फुरकान खान यांनी सांगितले.

# बिडकीन येथिल ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १६ ऑगस्ट

पैठण तालुक्यातील बिडकीन येथिल सेठ मोतिलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहामध्ये पार पडला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन सौ. माया नरसापुर हे होते व शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला व शाळेच्या मुख्यध्यापिका सविता तोतला यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन सरस्वती माता व भारत मातेच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. शाळेच्या शिक्षिका काजल देशमुख यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सौ. माया नरसापुर यांनी स्वातंत्र्य दिनी आपल्या भाषणाद्वारे उपस्थितांना संबोधित केले. तसेच शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला व शाळेचे मुख्यध्यापिका सविता तोतला यांनी ही स्वातंत्र्य दिनी भाषण केले. या विशेष दिवशी पालकांनीही हजेरी लावली होती. शाळेच्या परिसराभोवती तिरंगा रॅली काढण्यात आली. शाळेतिल सर्व विद्यार्थ्यांनी पिटी हॅन्ड करुन, देशभक्ती वर गिते गायली. त्याचबरोबर नृत्य, भाषणे, नाटक सादर करत उपस्थितांची मने जिंकली. ऑलंपियाड, चित्रकला, रांगोळी, फॅन्सी ड्रेस, निबंध लेखण, राखी बनवने, शाळेने असे विविध उपक्रम राबवले होते. या उपक्रमा मध्ये सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या उपक्रमामध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीसे व प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शालेय समितीने केले. व आभार प्रदर्शन शिक्षिका दिपाली हनुवटे यांनी केले. वर्षा चव्हाण, काजल देशमुख, सोनाली खोंड, दिपाली हनुवटे, कृष्णा भालेराव, दत्तात्रय चेडे, प्रकाश करोडीवल, ज्ञानेश्वर चव्हाण, तसेच शाळेतिल सर्व विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



## मोतीबाग येथे जयंत उमराणीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण

पुणे - स्वातंत्र्यदिनानिमित्त शनिवार पेठेतील मोतीबागेत राज्याचे निवृत्त पोलिस महासंचालक जयंत उमराणीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. भारतीय संस्कृती संवर्धक संस्था आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कसबा भागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात एकता मासिकाच्या काश्मीर विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच कै. दामूअण्णा दाते संदर्भ ग्रंथालयाचे उद्घाटन ज्येष्ठ प्रचारक, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य सुहासराव हिरेमठ यांच्या हस्ते झाले.



यावेळी पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर,कसबा भाग संघचालक प्रशांत यादव,भारतीय संस्कृती संवर्धक संस्थेचे अध्यक्ष राजीव जोशी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी मनोगतात ऑपरेशन सिंदूरविषयी माहिती सांगितली व आपल्या देशापुढील आव्हाने काय आहेत याबाबत माहिती दिली.महानगर संघचालकांनी मनोगतात स्वातंत्र्यपूर्व व उत्तर काळातील संघ स्वयंसेवकांच्या योगदानाविषयी माहिती दिली. कसबा भाग संघचालक प्रशांत यादव यांनी संघप्रणालीतील पंचसूत्रीविषयी माहिती दिली.सुधीर पाचपोर यांनी म्हणलेल्या अखंड वंदे मातरम् ने कार्यक्रमांची सांगता झाली.


## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश, क.स्तर न्यायालय गंगापुर यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५५९/२०२५

लक्ष्मीबाई भ्र.अशोक भुजंग व इतर

विरुध्द

निरंक

प्रकरण - Bombay Regulation Act 1827 चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे पिता नामे अशोक नामदेव भुजंग यांचा दि.०८/०४/२०२५ रोजी मौजे जोगेश्वरी, ता.गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला असुन अर्जदार नं. १) लक्ष्मीबाई भ्र.अशोक भुजंग, २) राजु अशोक भुजंग, ३) छाया भ्र. किरण काळे, रा.मोहन नगर, बालाजी नगर, ता.जि. औरंगाबाद ४) विजय अशोक भुजंग, अर्जदार नं. १, २ आणि ४ रा.भुजंग वस्ती, जोगेश्वरी, ता.गंगापुर जि. औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.बी.पी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ४ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.१६/०८/२०२५

आदेशावरून
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर गंगापूर

पु.ता. ०१/१०/२०२५

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ५५३/२०२५

अर्जदार : १. सुनिता संजय गोरे, वय. ४४ वर्ष धंदा. शेती २. किरण संजय गोरे, वय २१ वर्ष धंदा, शेती ३. चंद्रहास संजय गोरे, वय. २० वर्ष धंदा. शेती १ ते ३ रा. विठ्ठल मंदिराजवळ, सोलेगांव ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर - विरूद्धः-

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण - कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री. राधेशाम घनशाम पवार यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, असे की, अर्जदार नं. १ यांचे पती तसेच अर्जदार नं. २ व ३ यांची वडिल नामे संजय दशरथ गोरे हे दि. १५/०२/२०२५ रोजी मौजे सोलेगांव ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहे. अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयत संजय दशरथ गोरे यांना इतर दुसरे कोणीही वारस नाही व अर्जदार हे मयत संजय दशरथ गोरे यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत संजय दशरथ गोरे यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याकामी व इतर शासकीय कामासाठी आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत संजय दशरथ गोरे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्दतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत संजय दशरथ गोरे यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुद्दती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

लिपिक — सहायक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एल.एच. जाधव, सह-दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) औरंगाबाद यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १५६०/२०२५,

नि. क्रं.

१. त्रिविणी कनैया भंडारकर, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. तेली पंचायत, मोदीखाना, जालना. २. किर्ती राजेश गोले, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. साऊथ सिटी सिडको, महानगर-२, प्लॉट नंबर ४३५, तिसगांव, औरंगाबाद, ३. भावना संजय यादव, वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा. धर्स डे बाजार जवळ, घर-६९८, पेंशनपुरा, छावणी, औरंगाबाद

विरुद्ध

१. रिनाबी शैलेंद्र अमलेकर, वय सज्ञान, रा. ३४९, न्यू गौरी नगर, इंदोर (म.प्र.) २. माधुरी राहुल मुंडले, वय सज्ञान, धंदा घरकाम, रा. डि-विंग, ब्लॉक नंबर ३, मुथीयान रेसिडन्सी, सहकार नगर, उस्मानपुरा, औरंगाबाद. ३. गायत्री विनोद जिभलकर, वय सज्ञान, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे. ४. महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल र. सरळकर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत बच्छलाबाई रमेश चिंतामणी यांचा दिनांक ०७/०३/२०२५ रोजी हायटेक आधार हॉस्पीटल औरंगाबाद येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ३ व गैरअर्जदार क्रं. १ ते ३ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ व गैरअर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत वच्छलाबाई रमेश चिंतामणी यांचे वारस असून त्यांना शासकिय/निमशासकिय करीता वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे,

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १४/०८/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १४/०८/२०२५

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय व. स्तर औरंगाबाद

## अग्रलेख...

# आव्हानांचे सिंहावलोकन

पिंजऱ्याची दारे उघडून प्राणी-पक्ष्यांना सोडून दिले की, पुढे स्वतंत्रपणे जगण्यातील संकटे किंवा अडथळ्यांचा सामना त्या त्या प्राणी किंवा पक्ष्यास एकटेपणानेच करावा लागतो. माणसाचे तसे नाही. माणूस जमात समूहशास्त्राशी जोडली गेली आहे. माणसांचा समूह परतंत्रातून मुक्त झाला की, त्यास स्वतःच्या प्रगती वा उन्नतीकरिता सामूहिकपणे प्रयत्न करावे लागतात. म्हणूनच प्रदीर्घ काळ पारतंत्र्याच्या मानसिकतेत वावरलेल्या व दीड शतक थेट इंग्रजी गुलामगिरीत राहिलेल्या भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या वाटचालीचा आढावा घेताना, भारतीय समाज किंवा भारतातील मानव समूहाच्या प्रगतीचा आढावा घेणे अपेक्षित असते. १५ ऑगस्ट २०२२ रोजी आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा झाला. या दिवशी आपण स्वातंत्र्योत्तर वाटचालीच्या अमृत महोत्सवात पदार्पण केले. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने पुढच्या अडीच तपांचा काळ हा भारताचा अमृतकाळ असेल अशा जिद्दीने विविध विकास कामे हाती घेतली आहेत. गरीब, महिला, शेतकरी आणि युवक ही देशाची खरी संपत्ती आहे आणि या संपत्तीचे संवर्धन करण्यासाठी सरकारने प्रयत्नशील राहिले पाहिजे, ही सरकारची भूमिका आहे. गेल्या ७५ वर्षांच्या काळात भारताने अनेक स्थित्यंतरे अनुभवली, अनेक संकटे झेलली आणि अनेक समस्यांची ओझी अंगावर पेलत कधी सहजपणे तर कधी खडतरपणे पुढच्या काळाची वाटचाल सुरू ठेवली. ही वाटचाल कोणा एकाच्या बळावर पार पडत नसते. या वाटचालीचे श्रेय कोणा एका व्यक्ती वा नेत्यास देणेही योग्य नाही. त्यासाठी संघटितपणा आणि सकारात्मक सामूहिकतेचे पाठबळ लागते. भारताच्या प्रदीर्घ काळाच्या पारतंत्र्यामुळे सामूहिकतेचे महत्त्व समाजास पटल्यामुळे असेल, पण भविष्याच्या दिशेने ही वाटचाल अपरिहार्य आहे, हे ओळखून देशाच्या प्रत्येक नागरिकाने एकमेकांचा हात धरून ही वाटचाल केली, हे आता मागे वळून पाहताना लक्षात येते.

प्राणी किंवा पक्ष्यांना पिंजऱ्यातून सोडून दिल्यानंतर त्यांनी त्यांच्या जिवावर आपल्या जगण्याची वाटचाल करावी अशी त्यांच्या स्वातंत्र्याची संकल्पना असली, तरी माणसाच्या स्वातंत्र्यानंतर तसा विचार अशक्य होता. त्यामुळे सामूहिक मानसिकता घडविणे, देशाचे सामाजिक ऐक्य जपणे, संघटित करणे व बळकट करणे हे स्वातंत्र्यानंतरचे पहिले आव्हान होते. देशाला राष्ट्र म्हणून स्वतःचा चेहरा, स्वतःची ओळख निर्माण करण्याचे आणि विकासाची साधने उभी करून समाजपरिवर्तन घडविण्याचेही हे आव्हान होते. स्वातंत्र्य मिळताच भारतीय समाजात सहजपणे ऐक्य साधले जाईल, अशी स्थिती प्रत्यक्षात नव्हती. भाषा, प्रांत, धर्म, जाती, आदी अनेक वैविध्यांचा समाजाच्या वेगवेगळ्या समूहावर पगडा होता. हा पगडा कायम ठेवून भारतीयत्वाची भावना जपणे व ती बळकट करणे हे आव्हान असले, तरी ते पेलताना भारताचा राष्ट्रवाद आणि सांस्कृतिक वारसा या दोन बाबींचा मोठा आधार या काळात निःसंशय मिळाला होता. तसे पाहिले, तर राष्ट्रवादाच्या संकल्पनेचे सामर्थ्य अफाट असे आहे. या संकल्पनेमुळे सामाजिक, राजकीय क्रांती झाली, महायुद्धे भडकली, अनेक साम्राज्ये लयास गेली आणि अनेक राष्ट्रांचा नवोदयही झाला. त्यामुळे सामाजिक समूहांच्या अस्मिता किंवा धार्मिक स्वातंत्र्यास धक्का न लावता राष्ट्रवादाची संकल्पना पेलण्याची मानसिकता घडविण्याचे आव्हान होते. ते अजूनही कायम आहे. आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन, शेती व्यवस्था व औद्योगिक सुधारणांबरोबरच स्वबळावरील स्वयंपूर्ण विकासाच्या नियोजनासाठी बाजारपेठांचा विकास होणे गरजेचे असते. नागरिकांची क्रयशक्ती वाढविल्याखेरीज बाजारपेठांचा विकास होत नाही. क्रयशक्ती वाढविण्यासाठी नागरिकांच्या उत्पन्नाचे स्रोत उभे करावे लागतात. औद्योगिक विकास आणि सेवा किंवा अनुषंगिक क्षेत्रांचा विकास हीच उत्पन्नाची साधने असल्याने, हे चक्र पूर्ण करण्याच्या आव्हानास तोंड देण्याची क्षमता नागरिकांमध्ये यावी याकरिता शिक्षण, साक्षरता महत्त्वाची असते. स्वातंत्र्योत्तर काळाच्या पहिल्या दशकात देशात साक्षरता आणि शिक्षण प्रसाराचाच मोठा अनुशेष होता. समाजव्यवस्थेत लोकशाही मूल्यांचे भान रुजविणे हे त्यापुढचे आव्हान होते. स्वातंत्र्यलढ्यामुळे साक्षर समाजात राष्ट्रभावनेचे बीज रुजले असले, तरी पोट भरण्याची भ्रांत असलेला मोठ्या वर्गास मात्र आपण पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त होऊन स्वतंत्र झालो आहोत, म्हणजे नेमके काय झाले आहे, हे अनुभवण्याचे वातावरण तयार झाले नव्हते. त्यामुळे जगण्यापुरते अन्न, अंगभर वस्त्र आणि निवाऱ्याचे छप्पर या तीन गरजांची हमी मिळाल्याखेरीज स्वातंत्र्यास अर्थ नाही, असाही एक विचारप्रवाह होता. स्वातंत्र्यानंतरची वाटचाल करताना समाजपरिवर्तन किंवा देश उभा करण्याच्या संकल्पनेत या तीन गरजा सर्वाधिक महत्त्वाच्या ठरल्या होत्या. त्या दृष्टीने स्वातंत्र्यानंतरची पहिली २५ वर्षे फारशी दिलासादायक नव्हती. ज्यांनी परदेशातून आयात केलेला सडका, निकृष्ट दर्जाचा आणि विषारी बियामिश्रित मिलो खाऊन जगण्याचा संघर्ष केला, त्यांना या गरजाचे महत्त्व अधिक पटेल. गरिबी हटाओचा नारा इंदिरा गांधींनी दिल्यावर धोत्रामिश्रित सडका मिलो खाणाऱ्या समाजासही सुखी भविष्याची स्वप्ने पडू लागली होती. या परिस्थितीतून बाहेर पडण्याकरिता व्यापक प्रयत्न करण्याचे आव्हानही अधिक गंभीर झाले. कदाचित पहिल्या २५ वर्षांतील खडतर अनुभवांनी राष्ट्रउभारणीच्या पुढच्या प्रयत्नांना भक्कम बळ दिले आणि पुढच्या ५० वर्षांच्या पर्वाने भारताच्या भविष्याचा नवा मार्ग आखून दिला.

अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरण, आर्थिक स्वावलंबन म्हणजे, आत्मनिर्भरता आणि सामाजिक न्यायासह समाजवादी समाजरचना ही भारतीय अर्थव्यवस्थेची स्वातंत्र्यापासूनचीच संकल्पना होती. १९६५ मध्ये हरित क्रांतीच्या पाऊलखुणा उमटल्या असल्या, तरी त्या क्रांतीचे परिणाम पुढच्या दशकातच दिसू लागले. अन्नधान्याच्या उत्पादनात नवे तंत्रज्ञान अवतरले, दुग्धोत्पादन वाढविणाऱ्या धवल क्रांतीने देशात नव्या चैतन्याचे वारे वाहू लागले. १९७५ मध्ये भारताच्या तंत्रज्ञान क्षेत्राने आर्यभट्ट नावाच्या पहिल्या उपग्रहाच्या रूपाने अवकाशात भरारी घेतली. पुढचे दशक मनुष्यबळ विकासाच्या नव्या टप्प्याचे ठरले. या काळात सामाजिक क्षेत्रातही परिवर्तनाची चाहूल लागत होती. महिला सक्षमीकरणाचा पहिला हुंकार १९८५ मध्ये उमटला आणि ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीने महिलांना कर्तृत्वाच्या नव्या संधींची कवाडे उघडली. भारतातील जातिव्यवस्थेमुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक विषमता निर्माण झाली असून संधीच्या समान वाटपाचा हक्क काही समाजघटकांपासून हिरावला जात असल्याची खंत घटनाकारांना वाटत होती. या समस्येवर उपाय शोधण्यासाठी १९५३ मध्ये काकासाहेब कालेलकर आयोगाची स्थापना आणि इतर मागासवर्गीयांच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी १९७८ मध्ये स्थापन करण्यात आलेला मंडल आयोग हा सामाजिक परिवर्तनाचा हा मोठा टप्पा मानावा लागेल. जागतिकीकरणाने विकासाची दारे खुली झाली. आज सहजपणे प्रत्येकाच्या तळहातावर असणाऱ्या मोबाईलमुळे जग खऱ्या अर्थाने जवळ आले आणि जागतिक ज्ञानाचे धागे खेडोपाडीपर्यंत पोहोचले. पुढच्या सलगतेने सुरू झालेल्या गेल्या अडीच दशकांना विकास पर्व असेच म्हणावे लागेल. मागासलेला देश अशी जागतिक भावना भारताने पुसून टाकलीच आहेच; या काळात विकासाच्या सर्व टप्प्यांना स्पर्शही केला आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, शेती, शिक्षण आदी अनेक क्षेत्रांत भारताची भरारी जगाच्या पाठीवर उठून दिसावी एवढी लक्षणीय ठरली आहे. गेल्या काही वर्षांत जगाने अचंबित व्हावे अशा वेगाने विकासाचे वारे देशात वाहू लागले आहेत. मात्र, स्वातंत्र्यापासून अभावग्रस्त अवस्थेत असलेल्या अनेकांपर्यंत ते वारे अजूनही पोहोचलेले नाहीत. त्यातून जुन्या समस्या पुन:पुन्हा डोकी वर काढतात. संघर्ष उफाळतात, सामाजिक स्वास्थ्य बिघडते. विकासातील असमतोलामुळे सामाजिक वाद उफाळतात. काही राज्ये अतिविकसित तर काही विकासापासून वंचित अशी स्थिती दिसते आणि प्रादेशिक वाद उभे राहतात. त्यातून सामाजिक सलोखा संकटात येतो. लोकसंख्या, गरिबी, स्वच्छता, आरोग्य, शेती आणि शेतकऱ्यांच्या समस्या, निवारा आणि उपजीविकेचे प्रश्न अशा अनेक समस्या आजही देशासमोर आहेतच. या समस्यांनी विकासाच्या पर्यावरणाचा दर्जा खालावला आहे, हे अमान्य करता येणार नाही. तो पुन्हा उंचावण्यासाठी काय करावे लागते, तेही सर्वांस माहीत आहे. ते करण्याची तयारी आणि प्रामाणिक इच्छाशक्ती केव्हा निर्माण होणार, तो खरा प्रश्न आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतर शतकमहोत्सवाकडे जाणारी पावले या समस्या सोबत घेऊन वाटचाल करणार की पायाखाली गाडून पुढे जाणार, हा कळीचा मुद्दा आहे. त्या भविष्याचा वेध घेण्याची क्षमता समाजामध्ये रुजविणे हे यापुढचे एक आव्हान आहेच. ▮

---

## प्रासंगिक

**डॉ. सतीश चाफले**

# खालिद का शिवाजी : एक शोकान्तिका

जगातील प्रत्येक देशाला आपला इतिहास हा प्राणप्रिय राहिलेला आहे. तो असायलाही पाहिजे. कारण प्रत्येकाचा इतिहास संस्कृती, सभ्यता, त्यांची महान परंपरा याचा गौरव बाळगणारा असतो. परिणामी प्रत्येकाला आपल्या इतिहासाचा अभिमान वाटतो. महाराष्ट्राचा इतिहास छत्रपती शिवरायांच्या कार्यकर्तृत्वाने देदीप्यमान झाला आहे. त्यात थोडा जरी कसूर झाला तरी मराठी माणूस पेटून उठतो. इतिहासाचे विकृतीकरण तर बिलकूलच खपवून घेतले जाणार नाही. सध्या महाराष्ट्रात अशाच एका वादाला तोंड फुटले आहे. निमित्त आहे एका मराठी सिनेमाचे; ज्याचे नाव आहे 'खालिद का शिवाजी.'

इयत्ता पाचवीतल्या मुलाला ज्याचे नाव खालिद, त्याला इतिहासाचा अभ्यास करताना पडलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधताना चित्रपट लेखकाला आणि दिग्दर्शकाला महाराजांचा नवीन इतिहास सापडला आणि त्यांनी शिवरायांचा इतिहास बदलवून टाकला. म्हणे तर काय?, छत्रपती शिवरायांच्या सैन्यात ३५ टक्के मुस्लिम होते. महाराजांच्या १७ अंगरक्षकांपैकी ११ हे मुस्लिम होते. राजेंनी राज्याभिषेकावेळी मुस्लिमांसाठी रायगडावर मशीद बांधली. छत्रपती शिवारायांचा एकेरी उल्लेख, या वाक्यांना घेऊन खरा वाद आहे आणि तो अपेक्षित आहेच. कारण छत्रपती शिवरायांच्या चरित्रावर सर्व अंगाने संशोधन झाले आहे. त्यात वरील बिंदूना घेऊन कुठेही संदर्भ आढळला नाही किंवा वरील बिंदूंना तात्त्विक आधारही चित्रपट निर्माणकर्त्यांना देता आला नाही.

तत्कालीन प्राथमिक संदर्भ साधनामध्ये महाराजांचे समकालीन असलेले कृष्णाजी अनंत सभासद यांची 'सभासद बखर' तसेच मल्हार रामराव चिटणीस लिखित सप्त प्रकरणात्मक चरित्र ज्याला 'चिटणीस बखर' असे म्हणतात. ही शिवकालीन मूळ ग्रंथ मानली जातात. यात कुठेही वरील वाक्यांचा संदर्भ मिळत नाही. मुळात महाराजांच्या सैन्य दलात घोडदळ-पायदळ अशी रचना होती. ती संख्या दोन लक्षच्या घरात असावी. या संख्येत मुस्लिम सैन्य होते का? तर, अनेक इतिहासतज्ज्ञ म्हणतात, ती असेल तर अगदी बोटावर मोजण्याइतपत असावी. या सैन्यात सरनोबत म्हणून नूर खान बेगचा उल्लेख आला आहे. पण तो १६५७ च्या पूर्वी आला आहे. नंतर तो उल्लेख कुठेही सापडत नाही. त्या मागचे कारण असे आहे की, छत्रपती शिवाजी महाराज हे १६५७ च्या पूर्वी शहाजी राजे यांच्या वतीने स्वराज्यातील राज्य कारभार बघत होते आणि तत्कालीन व्यवस्थेत आदिलशाही राजदरबाराच्या वतीने शहाजी राजांच्या आज्ञानुसार कार्य सुरू असल्यामुळे त्या सर्व व्यवस्थेवर शहाजी राजे यांच्या व्यवस्थेचा प्रभाव होता. म्हणून शिवरायांना दिलेली माणसे ही शहाजी राजेंनी दिलेले होती. पुढे १६५७ नंतर शिवरायांनी आदिलशाहीला विरोध सुरू केला. त्यानंतर छत्रपती शिवरायांच्या सैन्य दलातील किरकोळ मुस्लिम संख्या जी होती ती पुढे दिसत नाही. यासोबत काजी हैदर नमक एक फारसी भाषातज्ज्ञाचा उल्लेख आहे. काझी हैदरची नियुक्ती दुभाषा म्हणून करणे काळाची गरज होती. यामुळेच महाराजांनी नंतर राज्य व्यवहार कोषाची निर्मिती केली. पण हाच काझी हैदर महाराजांच्या निधनानंतर औरंगजेबाला जाऊन मिळाला आणि नंतर त्याने स्वराज्यातील गुप्त बातम्या शत्रूंना देऊन स्वराज्याचे अतोनात नुकसान केले. मदारी मेहतरच्या बाबतीतही कुठलाही समकालीन ठोस पुरावा उपलब्ध नाही. समुद्रावर आपला वचक असावा म्हणून आरमाराच्या निर्मितीच्या प्रारंभीच्या काळात दौलतखानाची दर्यासारंग म्हणून नेमणूक केल्याचे दिसते, पण पुढे आग्रे आणि धुळप यांनीच आरमाराचे नेतृत्व केले. हा तुरळक उल्लेख सोडला तर महाराजांच्या सैन्य दलात मुस्लिम होते, याचा ठोस पुरावा उपलब्ध नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या १७ अंगरक्षकांपैकी ११ अंगरक्षक हे मुस्लिम होते, असं या चित्रपटातून ठामपणे सांगण्यात आले आहे. त्यालाही पुरावा नाही. फक्त त्यात सिद्धी हिलालचे नाव पुढे येते. अफजल खानाच्या वधाच्या प्रसंगी सिद्धी हिलालचा उल्लेख काही दुय्यम साधनांमध्ये केलेला दिसून येतो. भारतात मध्ययुगीन कालखंडामध्ये गुलाम विकत घेण्याची प्रथा होती. शिवरायांच्या नातेवाईकाने बालपणीच सिद्दी हिलाल यास विकत घेतले होते. त्याला क्रित पुत्र म्हणतात. म्हणून सिद्दी हिलाल जन्माने जरी मुस्लिम असला, तरी त्यावर हिंदू धर्माचेच संस्कार झाले होते.

रायगडावर मुस्लिमांसाठी मशीद बांधली होती, असाही उल्लेख सिनेमांत आहे. पण याला कुठलाही ऐतिहासिक पुरावा नाही. रायगडाचे बांधकाम हे हिरोजी इंदुलकर यांच्या देखरेखीखाली झाले, याची नोंद आहे. रायगडावर एक शिलालेख कोरला आहे. त्यात हिरोजींनी रायगडावर कोणकोणते बांधकाम झाले आहे, याचा उल्लेख केला आहे; त्यात कुठेही मशीद बांधल्याची नोंद नाही.

बाबा याकूतलाही महाराजांच्या गुरुस्थानी बसविण्याचा अट्टाहास किती ठामपणे केला जातो, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. 'खालीद का शिवाजी' या चित्रपटाच्या माध्यमातून चुकीचा खोटा विमर्श 'नरेटिव्ह' प्रस्थापित करण्याचा हा प्रयत्न दिसतो. सध्याच्या काळात सेक्युलरिझम आणि सर्वधर्मसमभाव यांचा उदो उदो चाललेला दिसतो. विशेषतः वाढत्या हिंदुत्वाच्या ताकदीला कमजोर करण्यासाठी डाव्या विचारसरणीकडून याचा वापर केला जातो. हिंदू समाजाला संभ्रमित करण्यात येते. इतकेच नाही, तर छत्रपती शिवाजी महाराजांवर असलेले समाजाचे उत्कट प्रेम अशा देशद्रोही डोळ्यांना अडथळा वाटत असल्याने शिवाजी महाराजांवरही सेक्युलर असा शिक्का मारण्यात येतो. त्याचप्रमाणे काही विशिष्ट धर्माचे शिवव्याख्याते छत्रपती शिवाजी महाराज हे मुस्लिमांचे कसे असे पटवून देण्यात मागेपुढे बघत नाही. खरं तर इस्लामच्या धर्मग्रंथात इतर धर्मीयांबद्दल असलेले क्रूर विचार आणि त्यांचा हजार वर्षांचा हिंसक इतिहास बघता सर्वधर्मसमभाव हे थोतांड वाटते. नरेटिव्ह सेट करण्यासाठी अशा सिनेमाचा आधार घेतला जातो, तोच प्रयत्न 'खालिद का शिवाजी' या चित्रपटातून झालेला दिसतो. सर्वसामान्यांना प्रश्न पडतो की, एकीकडे देश २१ व्या शतकात आधुनिकतेकडे वाटचाल करतो आहे. विचारांनी प्रगल्भ झालो असतानासुद्धा आम्ही सकारात्मक विचार करीत नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली एका कलाकृतीचे निर्माण करताना स्वतःची वैयक्तिक अस्मिता निर्माण करण्याच्या नादात राष्ट्रीय अस्मिता आम्ही विसरलो का? आपला पुरुषार्थ सिद्ध करण्यासाठी राष्ट्र-महापुरुषांचा मानसन्मान ही तेवढाच महत्त्वाचा आहे. असा विचार हा सामान्यापासून ते बुद्धिजीवीपर्यंत सर्वांनी विशेषतः चित्रपट निर्माते लेखक, दिगदर्शक यांनी करणे गरजेचे आहे. नाहीतर 'खालिद का शिवाजी' ही २१ व्या शतकातील शोकान्तिका बनून राहील. छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदुस्थानातील तमाम हिंदू समाजाचे श्रद्धास्थान आहे. शिवकालीन इतिहासाचे असे सादरीकरण हे कदापि खपवून घेतले जाणार नाही. अशा सिनेमावर बंदी घालणे हेच योग्य राहील. ▮

९४२३४०२०६९

(लेखक हे रातुम नागपूर विद्यापीठाचे इतिहास अभ्यास मंडळाचे सदस्य आहेत.)

---

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# भिंतीकडे तोंड तरीही ते ओळखायचे...

नरकेसरी प्रकाशन संस्थेच्या अमृत महोत्सवी आणि दैनिक तरुण भारतच्या शताब्दी वर्ष पर्यावरणाला समर्पित केले. बीज अंकुरेपासून सुरू झालेले हे अभियान आता मंदिर स्वच्छता आणि तुळशी लावा पर्यावरण वाचवापर्यंत पोहोचले. या अभियानातून कोणाला काय साध्य झाले, हे सांगता येत नाही. परंतु, मला मात्र एक खजिनाच मिळाला. स्वच्छता कशी असावी याचे उदाहरण फक्त संतनगरी शेगावच देऊ शकते. संत गजानन महाराजांच्या मागेपुढे विदर्भातही अनेक संत होऊन गेले. वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यात आजनसरा या खेड्यात झालेले संत भोजाजी महाराज पुरणपोळीच्या नैवेद्यासाठी प्रसिद्ध आहेत. येथे रविवार आणि बुधवारी हजारो क्विंटलचे पुरण शिजते आणि त्याचा नैवेद्य भोजाजी महाराजांना अर्पण केला जातो. आता तर देवस्थानने प्रसादालय सुरू केले. तेथेही पुरणाच्या पोळीचे भोजन मिळते. हे स्थळ विदर्भात बऱ्यापैकी प्रकाशझोतात आले आहे. याच मांदियाळीत आर्वी तालुक्यातील टाकरखेडा येथील संत लहानुजी महाराज देवस्थानमध्ये जाण्याचा योग आला आणि 'दिव्यत्वाची जेथे प्रचीती तेथे कर माझे जुळती' असेच झाले. संत लहानुजी महाराजांचे अनेक अनुभव ऐकायला मिळाले. त्यांच्या नेत्रांमध्ये तेज होते. आलेल्या भक्ताला त्या तेजाची वेदना होऊ नये म्हणून संत लहानुजी महाराज भिंतीकडे तोंड करून बसायचे. पण, निस्सीम भक्त आला तर भक्ताकडे न बघता ते भक्ताला नावासह आवाज द्यायचे, असे अनेक दृष्टांत त्यांच्या भक्तांनी अनुभवले आहेत. महाराजांच्या कृपादृष्टीने विश्वस्त मंडळाने हे संस्थान मोठे केले. सात एकरच्या विस्तीर्ण परिसरात जिथे सहज फिरता फिरता जाता येणार नाही अशा आडवाटेवर असलेल्या संत लहानुजी देवस्थानची शिस्त आणि स्वच्छता बघितल्यावर शेगावची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. मंदिर परिसरात शेती, गोशाळा आहे आणि बऱ्याच ठिकाणी ते पाहायलाही मिळते. परंतु, या धार्मिक ठिकाणावर लक्षवेधक ठरली ती 'लहानु स्पर्धा परीक्षा अभासिका व मार्गदर्शन केंद्र.' तिथे विदर्भातील अनेक जिल्ह्यातील पदवीधर स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करतात. आजपर्यंत जवळपास ३२ जणांनी येथे अभ्यास करून नोकरी मिळवली. गेल्या आठवड्यात लहानुजी महाराजांचा उत्सव झाला. उत्सवाच्या तीर्थ स्थापनेला एकाला आणि समाप्तीला दुसऱ्याला नोकरी लागली. स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन नि:शुल्क मिळते. ज्यांची परिस्थिती नाही तेच या ठिकाणी अभ्यासाला येतात. विशेष म्हणजे या ठिकाणी अभ्यासिकेत कोणत्या गरजूला प्रवेश द्यायचा हे येथे अभ्यास करणारे वरिष्ठ ठरवतात. त्यात विश्वस्तांचा हस्तक्षेप नसतो. मंदिरात १०५ घनमीटरचा गोबर गॅस सयंत्र, सेंद्रिय शेती प्रकल्प, एम. एस. स्वामीनाथन शेतकरी प्रशिक्षण शाळेसोबतच गांडुळ खत, गांडुळ पाणी, गोमूत्रापासून कीटकनाशक, गोबर गॅस खत, गोमूत्रापासून फिनाईल आणि देशी गाईच्या गोमूत्रापासून तयार केलेले गोअर्क ही उत्पादनंही येथे घेतली जातात. मंदिराकडे सहा कोटीचा निधी जमा आहे. त्या निधीच्या व्याजावर मंदिराचे व्यवस्थापन आणि देखभाल केली जाते. या मंदिरात प्रवेश करताच तेथील भव्यता जाणवते. लहानुजी महाराजांच्या भक्तांचा मोठा गोतावळा आहे. दिवसभर दर्शन घेणाऱ्यांची संख्याही मोठी असते. टाकरखेडा हे गाव वर्धा नदीच्या तीरावर वसलेले आहे. पैलतीरावर धामंत्री येथे प्राचीन शिवालय आहे. येथील महाकाय घंटा प्रसिद्ध आहे. जवळच रुक्मिणीचे माहेर कौंडण्यपूर आहे. प्रसिद्ध हिंदी अभिनेत्री हेमा मालिनीचे दैवत असलेले महारुद्र हनुमानाचे जहागिरपूर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा गुरुकुंज आश्रम, संत लहानुजी महाराजांचे गुरू आडकोजी महाराजांचे समाधी स्थळ वरखेड ही तीर्थस्थळं ओळीने असल्याने एक दिवसाची सहल सहज शक्य होते. या मंदिरांनी धर्म, संस्कृती व परंपरेचा वारसा जोपासून ठेवला आहे. लहानुजी संस्थान राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या उपस्थितीत १९६१ मध्ये स्थापन झाले आणि या संस्थानचे उद्दिष्टही तुकडोजी महाराजांनी ठरविले आहे. लहानुजी महाराजांचा आवडता रंग पांढरा असल्याने परिसरात सर्वत्र शुभ्रताच दिसते. शेगावसारखी व्यवस्था निर्माण करण्याचा मानस असलेल्या या देवस्थानला तीन वर्षांपूर्वी ब वर्ग दर्जा मिळाला. देवस्थानाचा विकास झाला असला, तरी अजून गावात जाणारी वाट मात्र बिकट आहे. भिंतीकडे तोंड करून माणसं ओळखणाऱ्या लहानुजी महाराजांच्या देवस्थानची 'वाट...' अजून प्रशस्त होण्याची तेवढी 'वाट...' ▮




९८८१९०३७६५

---

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# जरांगेंना खरेच काय पाहिजे?



माणूस प्रगती करतो आहे. नवनवे शोध लावतो आहे. काही काळाने पृथ्वी राहायला लायक राहणार नाही, हे हेरून नव्या पृथ्वीचा शोध त्याने सुरू केला आहे. त्याला नव्याचा ध्यास आहे. मात्र, काहींना एक गोष्ट सोडवत नाही, ती म्हणजे त्याचा धर्म, त्याची जात. 'जात नाही ती जात' असे म्हटले जाते. सारे मानव एक आहेत. साऱ्यांच्या अंगात सळसळणाऱ्या रक्ताचा रंग एकच म्हणजे लाल आहे. तरीही माणसाला आपली जात, आपली पोटजात विसराविशी वाटत नाही. विचार करायला हे विचित्र वाटते. पण कटू वास्तव आहे. अलिकडली समाजातली आंदोलनं पाहिली तर माणूस अस्वस्थ होतो. भाषिक, धार्मिक, जातीय... साऱ्याच प्रकारच्या अस्मिता कमालीच्या कडव्या होत चालल्या आहेत. आपल्या जातीचा अभिमान माणसाला पूर्वीपासून वाटत आला आहे. पण त्या मानसिकतेचा उपयोग तो मानवतेच्या भल्याकरिता करीत असे. अलिकडे या जातीय अस्मिता टोकदार होत चालल्या आहेत. अस्मिता बाळगणे वाईट नाही. उलट समाजाच्या जिवंतपणाचे ते लक्षण आहे. मात्र या अस्मितेचा नेमका अर्थ उमगत नसल्याने संघर्षांच्या ठिणग्या उडू पाहतात तेव्हा चिंता वाढते. त्यातून नवनव्या समस्यांना कोंब फुटताहेत. कोल्हापूरच्या मठातली हत्तीण परत मिळविण्यासाठी तिथे मोठे आंदोलन झालेले नुकतेच आपण पाहिले. मुंबईसारख्या व्यस्त शहरात भर रस्त्यात कबुतरांना दाणे खाऊ घालता यावेत यासाठी शांतताप्रिय जैन समाज रस्त्यावर आलेला आपण पाहिला. 'शाकाहारी कॉलन्यांनी' मांसाहाऱ्यांना दारं बंद केली आहेत. कल्याण डोंबिवली महापालिकेने स्वातंत्र्य दिनानिमित्त १५ ऑगस्टला मांस विक्रीला बंदी घातली तेव्हा त्याची अतिशय तीव्र प्रतिक्रिया उमटली. 'आम्ही काय खायचं हेही सरकार ठरवणार का?' असे लोक विचारू लागले. 'महाराष्ट्राला शाकाहारी राज्य बनवणार आहत का?' असाही प्रश्न काहींनी केला. मात्र माणसाची सहनशक्ती क्षीण झाली आहे. थोडं काही विरोधात गेलं तर त्याचं बीपी वाढतं. इतरांची मानसिकता लक्षात घ्यायची त्याची तयारी नाही. त्यातून समाजात संघर्ष, टक्कर वाढत आहेत. मूळ प्रश्न बाजूला पडत आहेत.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचेच उदाहरण घ्या. ओबीसी कोट्यातून मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, अशी त्यांची मुख्य मागणी आहे. मराठा आणि कुणबी एकच आहेत, असाही त्यांचा दावा आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे असे साऱ्यांनाच वाटते; सरकारलाही वाटते. त्यासाठी लढा देणारे जरांगे हे पहिले नाहीत. मराठा समाजाने ५१ मूकमोर्चे काढले आहेत. कुठेही कटुता, तणाव नव्हता. जरांगे यांची तळमळ समजू शकते. गेली तीन वर्षे त्यांनी आवाज उठवणे चालवले आहे. सहा उपोषणं केली. विधानसभेत समाजाचे उमेदवार उभे करण्याची सर्कस करून पाहिली. जमले नाही. त्यांच्या मागण्या समजू शकतात. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना सरकारने त्या लक्षातही घेतल्या. देवेंद्र फडणवीस सरकारही सकारात्मक आहे. पण त्याआडून कुणी राजकारण करू पाहत असेल तर अवघड आहे. जरांगे यांच्या बाबतीत तोच प्रॉब्लेम आहे. मराठा समाजाला आरक्षण हवे आहे. मात्र जरांगे यांना आरक्षणासोबत आणखी काही हवं आहे. त्यांना फडणवीस नको आहेत. त्यांना फडणवीसांची विकेट पाहिजे आहे. ती मिळत नाही हे पाहून जरांगे आणि त्यांचे गॉडफादर यावेळी आरपारची लढाई लढायला उतरले आहेत. जरांगे यांचे बोलवते धनी वेगळे आहेत. आता येत्या २९ ऑगस्टपासून मनोज जरांगे पाटील मुंबईत आंदोलन करणार आहेत. आरक्षण घेतल्याशिवाय उठायचे नाही, असा संकल्प त्यांनी सोडला आहे. साऱ्या समाज बांधवांना त्यांनी आपल्यासोबत गाड्याघोड्यांनी मुंबईला चालायचे आवाहन केले आहे. कल्पना करा. लाखोंच्या संख्येने मराठे मुंबईत मुक्कामाने आले तर मुंबईची काय अवस्था होईल? कल्पनाच करवत नाही. बाहेरचे मोर्चे नसतानाही मुंबईमध्ये वाहतुकीची जीवघेणी कोंडी असते. जरांगे यांच्या शब्दावर समजा लाखो लोक गाड्यांसह आले तर कायदा आणि सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न होणार आहे. गाड्या कुठे उभ्या करणार? पोलिस गाड्या आत येऊ देणार नाहीत. म्हणजे पोलिसांशी संघर्षांची वेळ येऊ शकते. आले तरी त्यांच्या खाण्या-पिण्याची, सकाळच्या प्रातर्विधीची काय व्यवस्था? जरांगे यांना नेमके काय हवे? सध्या सणासुदीच्या मुहूर्तावर मुंबईत येऊन त्यांना कोणाची फजिती करायची आहे? आता घरोघरी गणपती बसणार आहेत. गणपती हे सर्वांचे आराध्यदैवत आहे. या उत्सवात मुंबईचा माहोल काही और असतो. तो सांभाळताना पोलिसांची दमछाक होते. आता त्यात भर म्हणजे लाखो आंदोलक येणार असतील तर तो मोठ्या टेन्शनचा विषय होतो. मूर्ती घेऊन या असे पाटलांनी आवाहन केले आहे. इकडे समुद्रात शिरवू म्हणतात. सारेच अवघड आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न या अंगाने सरकार सध्या या आंदोलनाकडे पाहत आहे. जे काही आहे, पोलिस तर बोलतीलच; पण पोलिसच नव्हे तर सरकारमधील जबाबदार मंत्र्यांनीसुद्धा जरांगे आणि त्यांच्या आंदोलकांशी बोलले पाहिजे. आंदोलकांनी मुंबईत न येता काय तोडगा निघू शकतो; तसा मधला मार्ग काढला पाहिजे. आरक्षण ही अशी वस्तू नाही की खिशातून काढून देता येईल. एकनाथ शिंदे किंवा अजित पवार या दोघा उपमुख्यमंत्र्यांकडे ही जबाबदारी देता येईल. या आधीही जरांगे आपल्या 'सैन्या'सह मुंबईत यायला निघाले होते. एकनाथ शिंदे यांनी त्यांना वाशीमध्ये रोखलं. शिंदे तेव्हा मुख्यमंत्री होते. काय मागतात तो कागद दिला. मात्र विजयाचा आनंद अल्पजीवी ठरला. जरांगे मागताहेत ते एकनाथ शिंदे देऊ शकले नाहीत. फडणवीस सरकार देऊ शकते का? जरांगे यांना ते छान ठाऊक आहे. पण त्यांचे टार्गेट वेगळे आहे. असे नसते तर ज्यांच्याशी बोलायचे त्यांनाच टार्गेट का केलं नसतं. एकनाथ शिंदे आणि जरांगे यांचे तर छान ट्युनिंग होते. शिंदे यांच्या काळात मराठा आरक्षणाच्या दिशेने समिती नेमली गेली, खूप काम झाले. पण मराठा असतानाही एकनाथ शिंदे फार काही करू शकले नाहीत. मग परिस्थितीत असा काय फरक पडला? मराठ्यांनी खूप झेललं आहे. मराठ्यांना विश्वासात घेऊन बोललं पाहिजे. हा संवाद कमी पडतोय का? ही अखेरची लढाई आहे, असे जरांगे पाटलांनी मागेच म्हटलं आहे. जरांगे यांच्या पाठीशी नक्की किती समाज आहे, याचाही फैसला या निमित्ताने होऊन जाईल. मराठा समाजाची मोठी व्होट बँक आहे. आजही जातींकडे व्होट बँक म्हणून पाहिले जातंय. मराठा आंदोलन येतंय हे पाहताच ओबीसी नेते ॲक्टिव्ह मोडवर गेले आहेत. आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. जातीची गणितं लक्षात घेऊनच आजही सारेच राजकीय पक्ष सावधतेने आपले उमेदवार मैदानात उतरवतात. आपल्या राजकारणाची ही अपरिहार्यता आहे हे कबूल केलेच पाहिजे. त्यामुळेच 'चाणक्य' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आता अग्निपरीक्षा आहे.

यावेळचे टेन्शन वेगळे आहे. चार महिन्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. फडणवीसांना आणि त्यांच्या महायुतीला कुठल्याही परिस्थितीत त्या जिंकाव्याच लागतील. खरी हाणामारी मुंबई महापालिकेसाठी आहे. ठाकरे बंधू एकत्र लढले तर काँग्रेस कुणासोबत असेल? काँग्रेस या भावांसोबत नाही आली तर ठाकरे सेना म्हणजे उबाठाला मुस्लिमांची लोकसभेत पडली तशी मतं पडतील का? या वेळच्या निवडणुका भल्या भल्यांच्या हार्टचा ठोका चुकवणाऱ्या होणार आहेत. ▮

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

---

## वाचक पत्रे

# राष्ट्रध्वजाचा सन्मान प्रत्येकांचे कर्तव्य आहे....



आपण ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करत १५ऑगस्ट रोजी भारताला इंग्रजांच्या गुलामीतून स्वातंत्र्य मिळाले, त्या घटनेला आज ७८ वर्ष पूर्ण झाली आहेत. अर्थात हे स्वातंत्र्य आपल्याला सहजासहजी मिळाले नाही हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणाची अवती दिली, कित्येकांना तुरुंगवास भोगाव लागला. हजारो लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांच्या आणि स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागातून आपल्यालाही स्वातंत्र्य मिळाले आहे या क्रांतिकारकाच्या कार्याची ओळख आजच्या पिढीला व्हावी आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आजच्या तरुण पिढीने ही देश कार्यासाठी पुढे यावे या उद्देशाने देशभरात स्वातंत्र्याचा अमृत म होत्सव उत्साहात साजरा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रम ांतर्गत अनेक उपक्रमाचे आयोजन सरकारने केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज पासून म्हणजेच १३,१४,१५ ऑगस्टपर्यंत घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबवण्यात येणार आहे हे उपक्रमांतर्गत भारताच्या ध्वजारोहण ध्वज संहितेच्या नियम ाचे काटेकोरपणे पालन करून नागरिकांना आपल्या घरी ध्वज फडकण्याची परवानगी देण्यात आली आहे. स्वातंत्र्य दिन साजरा करण्याचे आल्याने सर्वत्र चे वातावरण तिरंगा मे होऊ लागले आहे.

कागदी आणि कापडी ध्वज बाजारात विक्रीसाठी आले आहेत. राष्ट्रीय सणाच्या निमित्ताने आहे. सरकारच्या वतीने हर घर तिरंगा मोहीम राबवली जात असल्याने घरोघरी त्या दृष्टीने सिद्धांता सुरू झाली आहे. कपड्यांच्या दुकानाचे डिस्प्ले तिरंगी कपड्याने सजू लागली आहेत. अन्य दुकानेही आपले देशाप्रतीचे प्रेम दर्शवण्यासाठी आणि ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी राष्ट्रवादीच्या रंगाचा वापर करून दुकानाबाहेर सजावट करू लागले आहेत. अनेक कार्पोरेट कंपन्याने कार्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी बुधवार गुरुवार शुक्रवार तिरंगा रंगाची अथवा पारंपारिक पोशाखा खालची थीम ठेवली आहे. अनेक सामाजिक संस्था आणि मंडळामध्ये, शाळा महाविद्यालयामध्ये स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते, त्याची सिद्धता ही सध्या जोमाने सुरू आहे. ऑनलाइन शॉपिंग संकेतस्थळी स्वातंत्र्य दिनानिमित्त उत्पादनावर विशेष सवलत ठेवली आहे सारे वातावरण देशभक्तीने जणू नाहूनच निघते. दरवर्षी तरी स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन जवळ आला की देशात देश प्रेमाचे वारे जोराने वाहू लागते. बाजारात ५,१० रुपयात मि ळणारा राष्ट्रध्वज खरेदी करणे सोपे आहे.मात्र त्याचा योग्य तो सन्मान राखण्याची भावना आपल्यात निर्माण झाली आहे काय हे अभ्यासणेही आज गरजेचे बनले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या एका पिढीने अपरिमित हाल अपेष्टा सहन केल्या. म ात्र त्यानंतरच्या पिढीने पुढच्या पिढीवर जे देश प्रेमाचे संस्कार करायला हवे होते ते न केल्याने स्वातंत्र्याचे मोल आजच्या पिढीला तितकेसे उरलेले नाही. आपल्या मनात आपल्या राष्ट्रध्वजा विषयायी आस्था किती आहे हे जाणून घेण्यासाठी सदर उदाहरणे पुरेशी आहेत राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्यास संदर्भ शासनाच्या वतीने प्रतिवर्षी ध्वज संहिता प्रकाशित करण्यात येते. मात्र ती वाचण्याची तसदी आपण कधी घेत नाही. राष्ट्रध्वज हे देशाच्या सन्मानाचे प्रतीक असते त्यामुळे त्याचा योग्य तो मान राखणे आपल्या प्रत्येकांचे कर्तव्य आहे. प्रत्येक नागरिकांनी आपण त्याची काळजी घेणे आवश्यक आहे. राष्ट्रध्वजाचा सन्मान प्रत्येकाने जपणे आपले आद्य कर्तव्य आहे याची जाणीव प्रत्येकाला असणे आवश्यक आहे.

**- सुनील पुजारी सोलापूर**

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## नॅचरल शुगर १२ लाख टन ऊस गाळप करणार : बी.बी.ठोंबरे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ ऑगस्ट -**

नॅचरल उद्योग समुह रांजणी येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त नॅचरल उद्योगचे संस्थापक अध्यक्ष कृषिरत्न बी.बी.ठोंबरे यांचे शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी श्री.ठोंबरे म्हणाले मागील वर्षी कारखाना कार्यक्षेत्रामध्ये समाधानकारक पाऊस झाल्याने व मांजरा धरण पुर्ण क्षमतेने भरल्यामुळे कारखाना कार्यक्षेत्रात मोठया प्रमाणात ऊस लागवड झालेली आहे.

गाळप हंगाम २०२५-२६ साठी कारखान्याकडे १८ हजार २०० हेक्टर्सची ऊस नोंद झालेली आहे. कारखान्याने गाळप हंगाम २०२५-२६ साठी १२ लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निर्धारीत केलेले आहे. त्यासाठी आवश्यक मशिनरी दुरूस्ती व देखभाल काम चांगल्या प्रकारे झाले असून येत्या ऑक्टोबर महिन्यामध्ये संपूर्ण मशिनरी गाळपासाठी सज्ज राहणार आहे.

कारखान्याकडे नोंदवलेल्या सभासद व बिगर सभासद यांच्या संपूर्ण ऊसाचे गाळप नॅचरल शुगरच करणार आहे. नॅचरल शुगरने सदैव मराठवाडयामध्ये सर्वाधीक ऊस दर देण्याची परंपरा कायम ठेवलेली आहे.

त्यामुळे कोणत्याही शेतक-यांनी भूल थापांना बळी पडून आपल्या ऊसाची इतरत्र विल्हेवाट करून आपले आर्थिक नुकसान करून घेवू नये असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व प्रास्ताविक कृषीभूषण पांडूरंग आवाड यांनी केले तर किशोर डाळे, प्रवर्तक, नॅचरल शुगर यांनी उपस्थिताचे आभार मानले.



# आकांक्षित जिल्ह्याचा शिक्का मिटवण्यासाठी सर्वजण एकत्र येऊया

**पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचे प्रतिपादन... ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन ध्वजारोहण कार्यक्रम उत्साहात... जिल्ह्यातील नागरिकांचा सहभाग..**





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ ऑगस्ट -**

जिल्ह्याचे मागासलेपण ओळखून केंद्र सरकारने जिल्ह्याचा समावेश आकांक्षित जिल्ह्यात केला आहे.केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांची स्क्षुम नियोजनातून आणि प्रभावी अंमलबजावणी करुन आकांक्षित जिल्हा म्हणून लागलेला शिक्का मिटवण्यासाठी सर्वजण एकत्र येऊया. असे आवाहन पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

७९ व्या भारतीय स्वातंत्र्य दिनाचे मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले. ध्वजारोहणानंतर उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. यावेळी स्वातंत्र्यसैनिक भास्करराव नायगावकर, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, मित्राचे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील,आमदार कैलास घाडगे,माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार,पोलिस अधिक्षक शफकत आमना,अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, जि.प.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी अुनप शेंगुलवार,निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव,उपजिल्हाधिकारी सर्वश्री शिरीष यादव,प्रविण धरमकर,संतोष राऊत,अरुणा गायकवाड,जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकुरकर, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता विजय थोरात,शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शैलेश चौहान,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास,जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे,सामाजिक वनीकरणचे विभागीय वनाधिकारी विश्वास करे, जि.प.चे मुख्य वित्त व लेखा अधिकारी सचिन इगे,राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक हर्षवर्धन शिंदे यांच्यासह विविध विभागाचे विभाग प्रमुख प्रामुख्याने उपस्थित होते.

पालकमंत्री सरनाईक बोलताना पुढे म्हणाले की,जिल्ह्याचे वनक्षेत्र हे १ टक्क्यापेक्षाही कमी आहे.जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी जिल्ह्याचे वनक्षेत्र वाढले पाहिजे यासाठी पुढाकार घेतला आणि हरित धाराशिव अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यात एकाच दिवशी १९ जुलैला १५ लक्ष वृक्षलागवडीचा संकल्प करुन तो प्रत्यक्षात देखील आणला.त्याची दखल वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड,एशिया बुक ऑफ रेकॉर्ड आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड यांनी घेतली.या वृक्षलागवड मोहिमेत नागरिकांचा उत्स्फूर्त होता.एक नवा विक्रम जिल्ह्याने या मोहिमेत नोंदविला आहे.या विक्रमाबद्दल पालकमंत्री यांनी धाराशिवकरांचे अभिनंदन केले.

चालू वर्षामध्ये जिल्ह्यातील ३४१ शेतरस्ते अतिक्रमणमुक्त करण्यात आल्याचे सांगून पालकमंत्री श्री.सरनाईक पुढे म्हणाले की, या शेतरस्त्यांचा जवळपास ६ हजार ५०० शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. जिल्हयातील ३ लक्ष ४६ हजार ६७८ शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅकची नोंदणी केली आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्यापही नोंदणी केली नाही,त्या सर्व शेतकरी बांधवांनी नोंदणी करण्याचे आवाहन श्री.सरनाईक यांनी याप्रसंगी केले.ते पुढे म्हणाले की,एप्रिल व मे २०२५ मध्ये आलेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे बाधित ११ हजार २८० शेतकऱ्यांना ९ कोटी रुपये निधी मंजूर केला असून बाधित शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे. ऑक्टोबर २०२४ च्या नैसर्गिक आपत्तीचे ८६ कोटी रुपये अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री सरनाईक पुढे म्हणाले, जिल्हाधिकारी कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या सर्व कार्यालयात ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वीत करण्यात आली आहे. ई-ऑफीस प्रणाली कामकाजात धाराशिव जिल्हा राज्यात चौथ्या क्रमांकावर आहे.तो पहिल्या क्रमांकावर यावा यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करावे,अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.ते पुढे म्हणाले,जिल्हयात ३३० गावांमध्ये दहन व दफनभूमीच्या बांधकामासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून सन २०२३-२४ मध्ये २६ कोटी ४० लक्ष रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात आला.त्यामुळे २६८ दहनशेड बांधकामे पूर्ण झाली आहेत. असे सांगितले.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या धाराशिव विभागाकडुन एप्रिल-२०२४ ते मार्च-२०२५ या कालावधीत ९७ हजार ४५२ विद्यार्थ्यांना, महिला सन्मान योजनेअंतर्गत १ कोटी ३३ लक्ष ९४ हजार महिलांना,६५ ते ७५ वर्षाच्या आतील १६ लक्ष ४० हजार ८५८ ज्येष्ठ नागरीकांना,७५ वर्षावरील १ कोटी २६ लक्ष ५ हजार ८१० अमृत ज्येष्ठ नागरीकांना प्रवास सवलतीचा लाभ देण्यात आला आहे.प्रवाशांच्या सुखकर व आरामदायी प्रवासासाठी धाराशिव विभागास ५५ नवीन लालपरी बस आणि प्रदुषण विरहीत ५ ई-बस प्रवाशांच्या सेवेसाठी उपलब्ध करुन देण्यात आल्याचे सरनाईक यांनी सांगितले.

प्रारंभी पालकमंत्री श्री.सरनाईक यांनी ध्वजारोहण करुन स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण केले.पोलिस बॅन्ड पथकाने राष्ट्रगीताने राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.राज्यगीत सादर केले.यावेळी विविध विभागात उत्कृष्ट काम केलेल्या अधिकारी-कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाला स्वातंत्र्यसैनिकांचे वारस,विविध क्षेत्रातील मान्यवर,विविध विभागाचे अधिकारी - कर्मचारी,नागरिक व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## अणदूर येथे भा.ज.यु.मो.च्या वतीने स्वच्छता अभियान



### जनतेला स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१६ ऑगस्ट -**

भारतीय जनता युवा मोर्चा नळदुर्ग तालुक्याच्या वतीने अध्यक्ष विक्रांत दुधाळकर यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला हर घर तिरंगा आणि माझी गल्ली माझी जबाबदारी या घोषवाक्याखाली धनगर गल्ली, अणदूर येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

हा उपक्रम यशस्वीपणे पार पडत असताना नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

अभियानादरम्यान गल्लीत व अंगणवाडी परिसरात असलेली झाडे-झुडपे, कचरा व रस्त्यावरील घाण काढून टाकण्यात आली. तसेच नागरिकांच्या सोयीसाठी रस्ते स्वच्छ करून सुरळीत मार्ग उपलब्ध करून देण्यात आला. या उपक्रमामुळे परिसर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी वातावरण निर्मिती झाली.

या उपक्रमात रोहन दुधाळकर, शिवशंकर करपे, विशाल गुडड, परमेश्वर घोडके, म्हाळप्पा गळाकाटे, ओम भालेकर, नितीन गळाकाटे, अमोल वाघे, राकेश दुधाळकर, सुभाष सोनटक्के, सुनिल मातोळकर, रवींद्र एडके, बंटी दुधाळकर, नागू भालकरे तसेच सर्व सहकारी उत्साहाने सहभागी झाले.

हा उपक्रम विक्रांत दुधाळकर (भा.ज.युवामोर्चा तालुकाध्यक्ष - नळदुर्ग ग्रामीण, तुळजापूर विधानसभा) यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत भविष्यात असे कार्यक्रम नियमितपणे राबवावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

# तेरणा धरण जोरदार पावसामुळे ओव्हरफ्लो

**तभा वृत्तसेवा/ शहाबाज मुलानी**
**तेर, दि.१६ ऑगस्ट -**



धाराशिव तालुक्यातील तेर येथील तेरणा धरण जोरदार पावसामुळे पूर्ण क्षमतेने भरून ओसंडून वाहू लागले आहे. दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर धरणाचे सर्व दरवाजे उघडण्यात आले असून, हे पाणी आता तेरणा नदीत सोडण्यात आले आहे.

या पावसामुळे धाराशिव शहरासह तालुक्यातील अनेक गावांचा पिण्याच्या पाण्याचा आणि सिंचनाचा प्रश्न मिटणार असल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. दुष्काळग्रस्त भागात ऑगस्ट महिन्यातच धरण भरल्याने हे दृश्य दिलासादायक ठरत आहे.

दुसरीकडे, धरण ओव्हरफ्लो झाल्याने तेरणा नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला असून, नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.


### १६५२ हेक्टरला कालव्याचा लाभ...

तेरणा मध्यम प्रकल्पाची निर्मिती १९६४ पूर्ण झाली. यानंतर १९९३ मध्ये या धरणाची उंची तीन फुटाने वाढविण्यात आली होती. धरणाची एकूण जलसाठवण क्षमता २०.५५४ दलघमी असून, मृत पाणीसाठा क्षमता ०.८९६ दलघमी आहे. उपयुक्त पाणीसाठा क्षमता १९.६६३ दलघमी आहे. धरणाच्या उजव्या व डाव्या बाजुला दोन कालवे असून, उजव्या बाजुच्या १६ किलोमीटर कालव्यामुळे ९०२ हेक्टर तर डाव्या बाजुच्या १५ किलोमीटर कालव्यामुळे ७०५ हेक्टर असे एकूण १ हजार ६५२ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले आहे.

गेल्या दोन दिवसांपासून तेरणा मध्यम प्रकल्प क्षेत्रात होत असलेल्या दमदार पावसाने तेरणा नदी पात्र दुथडी भरून वाहत आहे. यामुळे प्रकल्पातील पाण्याची आवक वाढून शुक्रवारी पहाटे तो ओव्हरफ्लो झाला. यामुळे धाराशिव शहरासह या प्रकल्पावर अवलंबून असलेल्या गावांचा पाणी प्रश्न मार्गी लागला आहे. सोबतच १ हजार ६५२ हेक्टर शेतीला सिंचनासाठी या पाण्याचा फायदा होणार आहे.

# वाशी तालुक्यात पावसाचा हाहाकार

**शेकडो हेक्टर पिके पाण्याखाली... नुकसान भरपाई देण्याची शेतकऱ्यांची मागणी... दसमेगाव मांडवा रस्त्यावरील पूल गेला वाहून पाच ते सहा गावचा संपर्क तुटला...**



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१६ ऑगस्ट -**

मागील दोन दिवसापासून वाशी तालुक्यात पावसाने हाहाकार माजवला आहे. अनेक मंडळात पावसाचा जोर कायम असल्याने शेतकरी नागरिक चिंतेत आहेत. सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. तालुक्यातील तीन पूल वाहून गेल्याने गावांचा संपर्क तुटला आहे. गावागावात पूरपरिस्थिती निर्माण झाली असून किराणा दुकाने, शेतकऱ्यांची खता औषधाची दुकान, पशुखाद्यांच्या दुकानात पावसाचं पाणी शिरल्याने दुकानदारांना मोठा फटका बसला आहे. त्यासोबत बाराही महिने नशिबी संकटे असलेला बळीराजा; त्याच्यावर मोठं अस्मानी संकट आलं. मुसळधार पावसामुळे शेतीचं नुकसान झाल्याने बळीराजा आता संकटात सापडला आहे.

एकामागून एक शेतकऱ्याचा संकटाचा त्याला सामना करावा लागत आहे. अतिवृष्टीने पिके पाण्याखाली गेल्यामुळे शेतकरी हातबल झाला आहे. ठिकठिकाणी शेतीला तलावाचे स्वरूप आले आहे. सर्वत्र पिके न दिसता चहूकडे पाणीच पाणी दिसून येत आहे. शेकडो हेक्टरवरील पिके पाण्याखाली गेली आहेत.

नदी, नाले, तलाव तुडुंब भरून वाहू लागले आहेत. पाण्याची चिंता मिटली पण शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

पाऊस असाच पडत राहिला तर यंदा शेतीला केलेला खर्च, बँकांचे कर्ज, पेरणीसाठी घेतलेले खाजगी सावकाराचे पैसे, खत औषधांची उधारी, मुलाबाळांच्या शिक्षणाचा खर्च कसा आणि कोठून भागवायचा असा प्रश्न आता शेतकऱ्याला पडला आहे. शेतमालाचे पडलेले दर त्यातून शेतकरी कसाबसा सावरत असताना आता अस्मानी संकटांनी शेतकऱ्याला घेरलं आहे.

पन्नास वर्षाच्या तुलनेत यंदा वाशी तालुक्यात पावसानं सर्वाधिक उंचांक गाठला आहे. तालुक्यातील बावी शिवारात तलाव फुटल्याची घटना घडली आहे. तर दसमेगाव मांडवा, उंदरे वस्ती वाशी व घोडकी रस्त्यावरील नागरिकांसाठी केलेले पर्याय फुल वाहून गेले आहेत.

त्यामुळे पाच ते सहा गावांचा संपर्क तुटला आहे. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी आता शेतकरी करत आहे.

आता सरकारकडून कधी पंचनामे करण्यात येणार हे पाहणे गरजेचे आहे. तसेच नुकसानीचे पंचनामे तात्काळ नाही केले तर विरोधकांकडून आंदोलने करण्यात येईल असे देखील बोललं जात आहे

## 'जवाहर'च्या अध्यक्षपदी सचिन बेडगे तर कोषाध्यक्षपदी सागर स्वामी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ ऑगस्ट -**



नळदुर्ग येथील जवाहर तरुण गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी सचिन बेडगे व तर सचिव पदी विवेक बेडगे, समर्थ बेडगे यांची निवड करण्यात आली आहे.

जवाहर तरुण गणेश मंडळाच्या वतीने याहीवर्षी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यासाठी मंडळाची नुकतीच बैठक होऊन या बैठकीत मंडळाची नविन कार्यकारीणी निवडण्यात आली ती पुढीलप्रमाणे आहे.

अध्यक्ष सचिन बेडगे, उपाध्यक्ष नंदु पोतदार, अभिजित पाटील, कोषाध्यक्ष सागर स्वामी, सचिव विवेक बेडगे, समर्थ बेडगे सहसचिव, गणेश पोतदार सल्लागार महादेव हत्त, बसवराज धरणे, अॅड.अरविंद बेडगे, अॅड.धनंजय धरणे, ज्योतिलिंग बचाटे, पिंटु बेडगे, संतोष पाटील, सुधीर बेडगे, विरेंद्र पाटील, शिवय्या स्वामी, सागर कलशेट्टी, रवी कलशेट्टी, संजय बेडगे, प्रशांत बेडगे,

मिरवणुक प्रमुख सुजय बिस्वास, कमलेश पोतदार, प्रशांत माळगे, महेश बेडगे, आकाश धरणे, सुरज धरणे, प्रवीण बेडगे, ओंकार स्वामी, संदीप बेडगे, अॅड.वीरेंद्र बेडगे, विश्वजीत बचाटे, ओंकार धरणे, अमित पाटील, जय फुलारी, शोभित बचाटे, वैभव पोतदार, गणेश कोरे अशी आहे.

# मंदिर विकास आराखड्यातून कोणावरही अन्याय होऊ देणार नाही

**पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचे मंदिर विकास आराखड्यातील बाधितांना आश्वासन...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ ऑगस्ट -**

राज्य सरकारने तुळजापूर शहर व श्री तुळजाभवानी मंदिर व परिसर विकास आराखडा हाती घेतला असून या आराखड्यातून कोणावरही अन्याय होऊ देणार नाही,असे आश्वासन पालकमंत्री श्री.प्रताप सरनाईक यांनी दिले आहे.



आज जिल्हाधिकारी कार्यालयात श्री क्षेत्र तुळजाभवानी मंदिर विकास आराखडा राबविताना विस्थापित पुजाऱ्यांना जागा निश्चित करण्याबाबत आयोजित बैठकीत पालकमंत्री सरनाईक बोलत होते. यावेळी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, पोलीस अधीक्षक शफकत आमना, अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, तुळजापूर उपविभागीय पोलीस अधिकारी नीलेश देशमुख,श्री तुळजापूर मंदिर संस्थानचे व्यवस्थापक तथा तहसीलदार अरविंद बोळंगे, मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे, पुजारी मंडळाचे बिपीन शिंदे, धीरज पाटील तसेच विस्थापित होणारे काही नागरिक यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री सरनाईक म्हणाले की, तुळजापूर हे धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचे ठिकाण आहे.दरवर्षी लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात. त्यामुळे शहरातील पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता व वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करणे ही काळाची गरज आहे. असे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री सरनाईक म्हणाले की, मंदिर विकास आराखडा हा केवळ दगड, सिमेंट व इमारतींच्या उभारणीपुरता मर्यादित नसून तुळजापूरच्या सर्वांगीण विकासाचे दर्शन घडवणारा असेल. स्थानिक नागरिक, व्यापारी, सेवेकरी व भाविक यांचे हित जोपासूनच विकासकामे राबवली जातील. कोणत्याही कुटुंबाचे नुकसान होईल असा निर्णय घेतला जाणार नाही. विकास आराखड्यामुळे रोजगार निर्मिती, पर्यटन वाढ, व्यापार वृद्धी आणि सोयी-सुविधांचा दर्जा उंचावेल, असे त्यांनी यावेळी नमूद केले.

श्री तुळजाभवानी मंदिर हा महाराष्ट्राच्या जनतेच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे मंदिर परिसरातील सौंदर्यीकरण, वाहतूक व्यवस्थापन, निवास व भोजनाची योग्य व्यवस्था, स्वच्छता व पर्यावरण संतुलन या गोष्टींवर विशेष भर देण्यात येणार आहे. भाविकांना त्रास होणार नाही आणि स्थानिकांचा व्यवसाय अबाधित राहील यासाठी नियोजनात लवचिकता ठेवण्यात येईल, असेही पालकमंत्री श्री.सरनाईक यांनी स्पष्ट केले.

पालकमंत्री श्री.सरनाईक पुढे म्हणाले की,या विकास आराखड्यासाठी राज्य शासनाने आवश्यक निधीची तरतूद केली आहे. आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी स्थानिक प्रतिनिधी, प्रशासन, नगरपरिषद व मंदिर व्यवस्थापन यांच्यात समन्वय साधण्यात येणार आहे. तुळजापूरचा विकास म्हणजे केवळ एका शहराचा विकास नसून, हा लाखो भाविकांचा विश्वास आणि भावनांचा सन्मान आहे. त्यामुळे या आराखड्याबाबत कोणत्याही प्रकारचे राजकारण न करता सर्वपक्षीय सहकार्य आवश्यक आहे, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. शेवटी पालकमंत्री श्री.सरनाईक यांनी नागरिकांना आवाहन केले की, विकास प्रक्रियेत प्रशासनाला सहकार्य करावे, आपल्या सूचना मांडाव्यात आणि शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी हातभार लावावा.

# जालन्यात भाजपातर्फे तिरंगा पदयात्रा उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

स्वातंत्र्य दिनानिमित्त भारतीय जनता पार्टीतर्फे हर घर तिरंगा अभियानांतर्गत तिरंगा पदयात्रा मोठ्या उत्साहात काढण्यात आली. या पदयात्रेची सुरुवात सरस्वती भुवन शाळेतून झाली. मार्गक्रमण करत हुतात्मा स्मारक, लोकमान्य टिळक स्मारक, स्व. भगवंतराव गाढे स्मारक (माजी मंत्री), सावित्रीबाई फुले स्मारक आणि महात्मा गांधी स्मारक येथे पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले व त्यानंतर ही पदयात्रा पुन्हा सरस्वती भुवन शाळेत येऊन संपन्न झाली.

या पदयात्रेत भाजपा नेते माजी आमदार कैलासजी गोरंट्याल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, अक्षय गोरंट्याल यांच्यासह देशभक्त नागरिक, आजी – माजी पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या पदयात्रेचे आयोजन जुना जालना मंडळ अध्यक्ष महेश निकम यांनी केले. देशभक्तीच्या घोषणा आणि राष्ट्रीय ध्वजाच्या फडक्यात ही पदयात्रा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.



# जाफराबाद येथील नगरसेवकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये प्रवेश

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जाफराबाद येथील नगरपंचायतच्या चार नगरसेवकांनी आज दिनांक १६ आगस्ट शनिवार रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून जालना जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला.

याप्रसंगी जाफराबाद नगर पंचायतचे नगरसेवक शेख मुश्ताक शेख रशीद, नगरसेवक तालीब खॉन तय्यब खॉन पठाण, नगरसेवक शेख रऊफ शेख रहीम, नगरसेवक, नगरसेविका श्रीमती सुनीता सुमित गोफणे, विजय गोफणे यांनी यावेळी राष्ट्रवादीत प्रवेश केले.



प्रवेश प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष शहा आलम खान, जालना विधानसभा अध्यक्ष प्रतापराव शिंदे, जालना जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चितेकर, जालना शहर कार्याध्यक्ष मिर्झा अन्वर बेग, शेख महेमूद, जाफराबाद तालुका अध्यक्ष दत्तू पाटील अंभोरे, जालना तालुका अध्यक्ष संतोष ढेंगळे, किसान सेलचे जिल्हाध्यक्ष शिवचरण बाळराज, शहर उपाध्यक्ष प्रतापराव लहाने, विष्णू घुले, सलमान पठाण तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जनविकास शिक्षण संस्थेत स्वातंत्र्य दिना निमित्त ध्वजारोहण

## संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण

तभा वृत्तसेवा
भोकरदन / प्रतिनिधी

भोकरदन येथील जनविकास शिक्षण संस्थेत देशाच्या स्वातंत्र्य दिन१५ ऑगस्ट निमित्त संस्थेचे अध्यक्ष तथा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी सर्व प्रथम शाळेतील विद्यार्थ्यांकडून मान्यवरांना पथ संचालन करुन सलामी देण्यात आली. व त्यानंतर विद्यार्थ्यांकडून भाषण, विविध गीतावर नृत्य व गायन, कवायती, सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. जिल्हास्तरीय विविध स्पर्धेत विशेष



प्रावीण्य मिळविलेल्या व लोकमत टाइम्स कॅम्पस क्लब देशभक्ती गीत गायन जालना जिल्हात प्रथम क्रमांक मिळविलेल्या सी. बी. एस. ई. माध्यमाच्या विद्यार्थांचा संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास कोषाध्यक्षा मंजुषाताई देशमुख, संचालक तुषार पाटील प्राचार्य शाळेतील पालक यांच्यासह संस्थेतील पदाधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

## मराठवाड्यातील पहिले तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा प्रक्रिया केंद्र बदनापूरात सुरु



तभा वृत्तसेवा
बदनापूर / प्रतिनिधी

बदनापूर स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा क्र. २ अंतर्गत मराठवाड्यातील पहिले तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा संकलन व प्रक्रिया केंद्र आज बदनापूर पंचायत समितीत कार्यान्वित झाले. या महत्त्वपूर्ण उपक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री व जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते झाले.

या प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, प्लास्टिक कचऱ्याचे वाढते प्रमाण ही गंभीर समस्या आहे. ग्रामीण भागात योग्य व्यवस्थापनाद्वारे स्वच्छता, पर्यावरण संरक्षण व आरोग्य सुधारणा यासाठी बदनापूरातील हे केंद्र आदर्श ठरेल. या कार्यक्रमाला भाजप जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष व आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., माजी खा. भास्कर दानवे, माजी आमदार भाऊसाहेब घुगे, बद्रीनाथ पठाडे, मुक्ताबाई गीते यांच्यासह अनेक मान्यवर व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या केंद्राच्या माध्यमातून गावोगावी संकलित होणारा प्लास्टिक कचरा योग्य पद्धतीने प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावली जाणार असून ग्रामीण स्वच्छतेच्या चळवळीत बदनापूरने मराठवाड्यास नवा मार्ग दाखविला आहे.

# संक्षिप्त

## १५ ऑगस्ट रोजी एक पेड माँ के नाम अभियान सिंगोना शाळेत राबविण्यात आले



तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनिधी.

परतुर तालुक्यातील सिंगोना येथे जि. प. प्रा शाळेत १५ ऑगस्ट रोजी एक पेड माँ के नाम अंतर्गत विद्यार्थ्यांना झाडे वाटप करण्यात आली. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, मुंजाराम कदम. कैलासराव सोळंके. सरपंच, ज्ञानेश्वर मांटे, अशोक वाघमारे, व प्रतिष्ठित नागरिक, अंकुशराव लांडगे, बाबूराव गरड, हरिभाऊ सोळंके, येणूबाई लांडगे, कालींदा गरड, शाळेतील मुख्यध्यापक, सी. टी. काकडे, सहशिक्षक डी. आर. लहाने, आर. एन. सावंत. श्रीमती एस. व्ही. कुलकर्णी, श्रीमती ए. सी. ससाणे. श्रीमती ए. पी. सोईतकर आणि गावकरी यांच्या उपस्थिती हा कार्यक्रम पार पडला आहे.

## तळणी येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त भव्य भाषण स्पर्धा



तभा वृत्तसेवा
तळणी / प्रतिनिधी

स्वातंत्र्यदिनानिमित्त माय भारत जालना व संत भगवान बाबा युवा मंडळ मंठा यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वनाथ विद्यालय, तळणी येथे भव्य भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धा दोन गटांत घेण्यात आली. पाचवी ते सातवी या गटात प्रतीक घटमाळ याने प्रथम, ईश्वरी चंदेल हिने द्वितीय तर आरती काळे हिने तृतीय क्रमांक पटकावला. आठवी ते दहावी गटात नेहा गुंड हिने प्रथम, अनुराधा नाईक हिने द्वितीय तर पुनम राठोड हिने तृतीय क्रमांक मिळवला. विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे मुख्याध्यापक प्रा. एस. पी. लोंढे हे होते. तर अनिल पांचाळ, गणेश मापारी, गजानत देशमुख तसेच संत भगवान बाबा युवा मंडळाचे अध्यक्ष वैभव कांगणे, विष्णुसिंग चव्हाण, योगेश कांगणे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

## कृष्णा मस्के यांच्याकडुण जि. प. शाळेत क्षैक्षणिक साहित्य वाटप



तभा वृत्तसेवा
परतुर / प्रतिनिधी

परतूर तालुक्यातील मौजे पाडळी (पारधी) येथील जिल्हा परिषद शाळेत सामाजिक उपक्रम हाती घेत कृष्णा मस्के यांनी स्वतः च्या गावाच्या शाळेला शैक्षणिक साहित्य स्वखर्चाने दिले. तसेच दिनांक१५/०८/२०२५ रोजी ग्रामपंचायत कार्यालय पाडळी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाडळी येथे ध्वजारोहण करण्यात आला. त्यावेळी गावातील जिल्हा परिषद शाळेत पंचायत समिती परतूर येथे कार्यरत असलेले कृष्णा मस्के (इंजिनियर घरकुल विभाग) यांनी शैक्षणिक साहित्य भेट दिली. त्यामध्ये दोन मार्कर बोर्ड, खुर्च्या, फॅन व मुलांना खाऊ देण्यात आला. त्यावेळी उपस्थित प्रतिष्ठित नागरिक तसेच ग्रामविकास अधिकार श्रीमती. चाटे मॅडम, सरपंच प्रसादराव काकडे, उपसरपंच शामराव काळे, भगवान मोटे (ग्रा. सदस्य), राम ठोके (संगणक परिचालक), सावित्रीबाई काकडे (ग्रा. सदस्य) मिठाबाई काळे, मुख्याध्यापक अमोल राठोडे, जिजामाता गुरूकुल संचालक अर्दड, सहशिक्षिका बालापुरे मॅडम, अंगणवाडी सेविका श्रीमती.जे. व्हि. काळे, आशाताई मीरा पवार, पांडुरंग बोराडे ग्रा. शिपाई, पुंजाराम कासार रोजगार सेवक, कृष्णा वाघ, बाळाभाऊ मस्के, कुंडलिक मस्के, भगवान बोराडे, युनुसमियां मोमीन, अहेमद मोमीन, संपतराव वाघ, रवि पवार तसेच गावातील सर्व नागरिक उपस्थित होते.

## सपोनि हरिदास जंगले यांना विषेश सेवा पदक प्रदान



तभा वृत्तसेवा
अंबड / प्रतिनिधी

गोंदी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक हरिदास जंगले यांना विशेष सेवा पदक पालकमंत्री पंकजाताई मुंढे यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. अंबड तालुक्यातील गोद्री पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक या अगोदर ते गडचिरोली जिल्हयात नक्षलवाद्यांच्या हिंसक बेकायदेशीर कारवायांना उत्कृष्ट सेवा केल्याबद्दल व परिणामकारकरीत्या आळा घातल्याबद्दल सध्या ते जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात गोंदी पोलीस सध्या ते कार्यारित आहेत ते निमित्त उपनिरीक्षक हरिदास जंगले यांना जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते विशेष सेवा पदक प्रदान करण्यात आले.

# परतूरला स्व. श्रीकृष्ण भारूका यांची जयंती साजरी



तभा वृत्तसेवा
परतूर / प्रतिनिधी

शहरातील पत्रकारांच्या वतीने शनिवारी (दि. १६) दिवंगत पत्रकार स्व. श्रीकृष्ण भारूका यांची जयंती साजरी करण्यात आली. मोंढा विभागातील पत्रकार राजकुमार भारूका यांच्या निवासस्थानी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लालबहादूर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य डॉ. भगवानराव दिरंगे हे होते.

यावेळी बोलताना डॉ. दिरंगे म्हणाले की, स्व. श्रीकृष्ण भारूका यांनी प्रतिकूल परिस्थितीशी झगडत 'सा. भूकंप'च्या माध्यमातून जनसेवा केली. आपल्या लेखनीच्या बळावर त्यांनी अनेक समस्यांना वाचा फोडली. त्यामुळे अनेक समस्या मार्गी लागल्या. सा. भुकंपचा अंक ते नियमितपणे काढायचे. तेव्हाच्या काळी आजच्या सारख्या सुविधा उपलब्ध नव्हत्या. तरीही ते वेळेवर अंक प्रकाशित करायचे हे विशेष. तसेच त्यांनी बातमी लिहिताना कधीही एकांगी भूमिका घेतली नाही. चांगल्या कामाचे त्यांनी निश्चितच कौतुक केले मात्र वाईट कृत्याच्या विरोधात धारदारपणे लिखाणही केले. आपल्या पत्रिकारितेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक कार्याचा वसाही जपला असेही डॉ. दिरंगे म्हणाले.

यावेळी पत्रकार अर्जुन पाडेवार, रमेश आढाव, अजय देसाई, अशिष गारकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. पत्रकार राजकुमार भारूका यांनीही याप्रसंगी स्व. श्रीकृष्ण भाऊंच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी पत्रकार बालाजी ढोबळे यांची उपस्थिती होती.



राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथील विद्यार्थी वेदांत राहुल वरगणे व अनुश्री दुनगहु या बालगापोलांनी कृष्ण जन्माष्टमी निमित्त राधा–कृष्णाची वेशभूषा साकारली.

# शिक्षण व्यक्तीला ज्ञान, कौशल्ये आणि आत्मविश्वास प्रदान करते आणि शिक्षित व्यक्ती समाजाला सुसंस्कृत आणि प्रगतिशील बनवतात - आ. लोणीकर

तभा वृत्तसेवा
मंठा / प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून दर्जेदार शिक्षणासाठी पीएमसी योजनेतून देशभरातील १५ हजार शाळांची निवड; पीएम श्री योजनेच्या माध्यमातून जिल्हा परिषदेच्या शाळेला इमारतीसह सर्व भौतिक सुविधा मिळाल्या. शिक्षण व्यक्तीला ज्ञान, कौशल्ये आणि आत्मविश्वास प्रदान करते. यामुळे व्यक्ती स्वावलंबी बनते आणि तिच्या जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित होते. शिक्षित व्यक्ती समाजाला सुसंस्कृत आणि प्रगतिशील बनवतात. शिक्षणामुळे सामाजिक समानता, सहिष्णुता आणि एकता वाढते. अंधश्रद्धा आणि गैरसमज दूर होतात. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री व परतूर मंठा विधानसभा मतदार संघाचे विद्यमान कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. १६ ऑगस्ट २०२५ रोजी पीएम श्री जिल्हा परिषद उर्दू हायस्कूल नूतन, मंठा, तालुका मंठा, जिल्हा जालना येथे ९ व्या वर्गाचे उद्घाटन आणि आभार सोहळा उत्साहात संपन्न झाला. बबनरावजी लोणीकर, माजी मंत्री आणि परतूर–मंठा विधानसभेचे आ., यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या वेळी उपस्थित विध्यार्थी व नागरिक यांना मार्गदर्शन करत असताना ते बोलत होते. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व, विशेषतः उर्दू माध्यमातील शिक्षणाचा प्रसार आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी संधी निर्माण करण्याच्या गरजेवर भाषणातून प्रकाश टाकला. पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की शिक्षणामुळे व्यक्तीला चांगल्या नोकरीच्या संधी मिळतात, ज्यामुळे आर्थिक स्थिरता येते. शिक्षित समाज हा राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देतो. शिक्षण नवीन विचार, संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या विकासाला प्रोत्साहन देते. यामुळे समाजात नाविन्यपूर्ण बदल घडतात. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये नैतिकता, जबाबदारी आणि कर्तव्याची जाणीव निर्माण होते. यामुळे ती एक चांगला नागरिक बनते. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात शिक्षणामुळे व्यक्ती आणि देश वैश्विक स्तरावर स्पर्धा करू शकतात. भाषा, तंत्रज्ञान आणि संस्कृती यांचे ज्ञान मिळवून व्यक्ती जागतिक नागरिक बनते. असे ही या वेळी आमदार लोणीकर यांनी आपल्या भाषणात नमूद केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या पीएम श्री योजनेमध्ये मंठा शहरातील १ ली ते १० मराठी माध्यमाच्या शाळेबरोबरच उर्दू नूतन हायस्कूल मंठा या शाळेचा समावेश करण्यात आला असून पीएम श्री योजनेअंतर्गत या शाळेला मिळालेल्या एकूण सुविधामध्ये सोलर पॅनल व बॅटरी, सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही कॅमेरे, वॉटर फिल्टर, आयसीटी रूम, १० संच असलेली कॉम्प्युटर लॅब, क्राफ्ट रूम, सायन्स लॅब इत्यादी सुविधा मिळालेल्या आहेत. या शाळेमध्ये एकूण विद्यार्थी ४०२ विद्यार्थी शिक्षण घेत असून भविष्यात मुस्लिम समाजाच्या विद्यार्थ्यांना देखील स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून आयएएस किंवा आयपीएस दर्जाचे अधिकारी बनावे असे अपेक्षा माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी व्यक्त केली. या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंठा नगरपालिकेचे नगराध्यक्ष वैजनाथ नाना बोराडे यांची उपस्थिती होती. शाळेच्या



मुख्याध्यापकांनी आणि व्यवस्थापन समितीने उपस्थित मान्यवर, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांनी उर्दू कविता, भाषणे आणि सांस्कृतिक नृत्यांचे सादरीकरण केले, ज्यामुळे कार्यक्रमाला उत्साहपूर्ण वातावरण मिळाले. स्थानिक नेते, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, जिल्हा परिषदेचे अधिकारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही शाळा मंठा परिसरातील उर्दू भाषिक विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची आहे, कारण येथे त्यांना मातृभाषेत शिक्षण मिळते, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास आणि शैक्षणिक प्रगती वाढते. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले. ९ व्या वर्गाची सुरुवात हा शाळेच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. हा सोहळा शाळेच्या इतिहासातील संस्मरणीय क्षण ठरला आणि विद्यार्थ्यांमध्ये नवीन उत्साह निर्माण झाला. शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष तौफिक जिलानी कुरेशी व सर्व शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी सतीशराव निर्वळ, पंजाबराव बोराडे, वैजनाथ बोराड, राजेश मोरे, अजय अवचार, सुरेश सरोदे, दीपक बोराडे, कबीर तांबोळी, इरफान हाजी गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण कय्युम कुरेशी, शबाब कुरेशी, सिराज पठाण, समंदर पठाण, मुस्तफा पठाण, जेके कुरेशी, बाज खा पठाण, एजाज शेख, केजी राठोड, कुरेशी यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# एकाही तरूणाला काठी लागली तर मुख्यमंत्र्यांसह आमदारांना फिरणे बंद करेल

## मराठा आंदोलक मनोज जरांगे यांचा पत्रकार परिषदेत इशारा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ ऑगस्ट**

मराठा आंदोलन मुंबईत आल्यानंतर पोलिस पाहून घेतील असे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्यानंतर त्यांना उत्तर देतांना मनोज जरांगे यांनी आम्हाला धमकी देऊ नये. आमच्या नादाला अजिबात लागू नये आंदोलनामध्ये एकाही तरूणाला काठी लागली तर राज्यातील मराठा समाज मुख्यमंत्र्यांसह आमदारां राज्यात फिरणे बंद करेल असा इशारा पत्रकार परिषदेत दिला.

येथील शासकीय विश्रामगृहात शनिवार दि १६ ऑगस्ट रोजी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी बोलतांना मनोज जरांगे म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण द्यावे या मागणीसाठी आमची लढाई सुरू आहे. या मागणीसाठी आता राज्यातील सर्व मराठा बांधव मुंबईत धडकणार आहेत. मुंबईमधील नागरिकांना आमचा त्रास व्हावा हा आमचा उद्देश नाही. आमच्या आरक्षणाच्या मागणीचा त्यांनाही फायदा होणार आहे. प्रत्येकजण न्यायासाठी मुंबईत आंदोलन करतो. त्यानुसारच आमचे आंदोलन आहे. त्यामुळे मुंबईकरांना आंदोलनासाठी सरकारला दोष द्यावा.

राज्यात ओबीसी व मराठा समाजात वाद पेटवला जात आहे. मात्र आपण सर्व एकाच गावात राहतो. एकमेकांच्या सुखदु:खात सहभागी होतो. त्यामुळे आपसामध्ये वाद करून घ्यायचा नाही. राज्यातील इतर समाजाने त्यांच्या प्रश्नांसाठी मदत मागितली तर मी आंदोलन करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

विधानसाभा निवडणुकीत आपण कोणालाही पाडा किंवा निवडून आणा असे म्हटले नाही. आम्हाला आरक्षणासाठी संघर्ष करावा लागणार हे आम्हाला माहीत होते. परंतु मराठा, दलीत आणि मुस्लीम समीकरण जुळले असते तर वेगळे चित्र पहायला मिळाले असते असेही ते यावेळी म्हणले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टिका करतांना देवेंद्र फडणवीस म्हणजे भाजप संपविण्यासाठी आलेला माणूस असल्याचा आरोप त्यांनी केला. निवडणुकीपूर्वी कर्जमाफीची आश्वासन दिले परंतु अद्याप शेतकऱ्यांना कर्जमाफी केली नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफी केल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाहीत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आधी मोठे मोठे पक्ष फोडले आता छोटे पक्ष संपवत आहेत. त्यामुळे राज्यातील छोट्या पक्षांनी सावध रहावे असा सल्लाही यावेळी मनोज जरांगे यांनी दिला.

पत्रकार परिषदेनंतर मनोज जरांगे यांची येथील महावीर भवना मराठा आंदोलक, समन्वयक यांच्यासोबत बैठक पार पडली. या बैठकीतला मोठ्या संख्येने मराठा बांधव उपस्थित होते.

# हिंगोलीत शिवसेना आणि भाजप नेत्यांत आरोप-प्रत्यारोप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ ऑगस्ट**

राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी कळमनुरी, औंढा नागनाथ तसेच वसमत येथे विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी नुकतीच बैठक घेतली. या बैठकीत भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी अधिकाऱ्यांना धमकावले तसेच मुख्यमंत्री आमचा आहे तुम्हाला निलंबीत करतो असा आरोप शिवसेनेचे आ. संतोष बांगर यांनी करीत त्यांची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार असल्याचा इशारा दिला. या आरोपानंतर भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी आरोप फेटाळीत तक्रार करा आणि दोघांच्याही संपत्तीची अँटी करप्शन कडून चौकशी करा अशी मागणी केली आहे. त्यामुळे जिल्ह्यात भाजप आणि शिवसेनेत आगामी काळात वादाची शक्यता वर्तवली जात आहे.

राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी जिल्ह्यातील कळमनुरी, औंढा नागनाथ तसेच वसमत येथील विविध कामांचा आढावा घेत अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सुचना अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीनंतर शिवसेना आ. संतोष बांगर आणि भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांच्यात जुंपली आहे.

या बैठकीत भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांचीही उपस्थिती होती. कळमनुरी आणि औंढा नागनाथ येथील बैठकीत भाजपचे जिल्हाध्यक्ष घुगे यांनी अधिकाऱ्यांचे पितळ राज्यमंत्र्यांसमोर उघडे पाडत त्यांना दम दिला. तसेच विकास कामांबाबत नाराजी व्यक्त केली. यावरून कळमनुरी विधानसभेचे शिवसेनेचे आ. संतोष बांगर यांनी भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांच्यावर आरोप केले. भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांना शासकीय अधिकाऱ्यांच्या बैठका घेता येत नाहीत म्हणून त्यांनी राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांना बोलावून बैठका घेतल्या. या बैठकीत गजाननराव घुगे यांनी अधिकाऱ्यांना धमकावत आमचा मुख्यमंत्री आहे. तुम्हाला निलंबीत करतो, कार्यवाही करतो अशा धमक्या दिल्या. यामागे गजाननराव घुगे यांना खिसे गरम करण्याचा हेतू होता, असा आरोप करीत गजाननराव घुगे यांची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार असल्याचेही आ. संतोष बांगर यांनी म्हटले.

शिवसेना आ. संतोष बांगर यांच्या आरोपांना उत्तर देतांना भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनीही जोरदार पलटवार केला. माझे मटका, जुगार, अवैध गुटखा, अवैध वाळू उपसा, वाहतुक असे कोणतेही अवैध धंदे नाहीत. मी आमदार असतांना माझ्या काळात कळमनुरी विधानसभा मतदार संघात कोणतेही अवैध धंदे चालू दिले नाहीत. माझी अवैध संपत्ती नाही की कोणाची संपत्ती मी घेतली नाही. हे धंदे कोणाचे आहेत, कोण वसुली करतात, कोण पैसे गोळा करतात हे जिल्ह्यातील सर्व जनतेला माहीत आहे. यावेळी आ. संतोष बांगर यांचे नाव न घेता तुम्ही सुध्दा सत्तेत आहात. माझ्या संपत्तीची अँटी करप्शन किंवा इतर यंत्रणांकडून चौकशी करावी आणि त्यासोबतच ज्यांनी आरोप केलेत त्यांच्या संपत्तीची चौकशी करावी. होऊन जाऊ द्या दूध का दूध अशी मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी केली. जिल्ह्यात शिवसेना आणि भाजपमध्ये एकमेकांवर आरोप प्रत्यारोप होत असून महायुतीमध्ये वादाची शक्यता आहे.

# हिंगोलीत अतिवृष्टीमुळे अनेक भागातील पिकांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली १६ ऑगस्ट**



शुक्रवारी दुपारनंतर जिल्ह्यातील अनेक भागामध्ये अतिवृष्टी सदृश पाऊस होत असून या पावसामुळे सोयाबीन, हळद तसेच इतर पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे दिसत आहे. शनिवारी पडलेल्या मुसळधार पावसामुळे कयाधू नदीला पूर आला असून समगा, नांदापूर येथील पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

जिल्ह्यात मागील तीन दिवसांपासून पाऊस सुरू आहे परंतु शुक्रवारी दुपारनंतर सेनगाव तालुक्यातील आजेगाव, ताकतोडा या गावांसह परिसरात अतिवृष्टी सदृश पाऊस पडल्यामुळे शेतातील सोयाबीनचे पीक आडवे झाले असून शेतात पाणी साचले आहे. सोयाबीनला नुकत्याच शेंगा लागल्या होत्या परंतु शुक्रवार आणि शनिवारी झालेल्या पावसामुळे सोयाबीन, हळद या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, आखाडा बाळापूर, वसमत, सेनगाव या तालुक्यातही मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. या पावसामुळे नदी, ओढे, नाले यांना पूर आला असून नदीकाठच्या शेतात पाणी शिरल्यामुळे शेताला तलावाचे स्वरूप आले आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे आतोनात नुकसान झाले असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. हातातोंडाशी आलेले पीक अतिवृष्टीमुळे वाया जात असल्यामुळे उत्पादनात घट होणार असल्याचे शेतकरी बोलत आहेत तर काही ठिकाणी संपूर्ण पीकच आडवे झाल्याचे सांगत आहेत. शनिवारी झालेल्या संततधार पावसाने जिल्ह्यातील शेतकरी हवालदिल झाला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे.



**हिंगोली- येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात छायाचित्रकार संघटनेच्यावतीने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, आ. संतोष बांगर, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, दिलीप चव्हाण, रामराव वडकुते, जगजीत खुराणा, बैजू पाटील, अशोक अग्रवाल, संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुनील पाठक, आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### गावगुंडांच्या मदतीने जागेवर ताबा करण्याचा प्रयत्न, आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

हिंगोली- शहरातील मल्हारवाडी भागातील आदर्श कॉलेजवळील पाण्याच्या टाकीजवळील सर्वे क्रमांक १ मधील ५३ गुंठे व साक्षीदार प्रसन्नकुमार बडेरा यांची १४ गुंठे जमिनीवर दि १४ ऑगस्ट रोजी आरोपी रामकिशन चतुरलाल जैस्वाल रा हिंगोली याने गैरकायद्याची मंडळी जमवून जेसीबी क्रमांक ३८ व्ही ७४६५ च्या सहाय्याने या जागेवरील सिमेंटचे पोल, सिमेंट कंपाउंड व फिर्यादी ॲड रवींद्र बालकिशन सोनी रा शिवाजी नगर यांच्या मालकी नावाची पाटी तोडून अंदाजे १० ते १५ हजारांचे नुकसान केले. या जागेवर ताबा घेण्याच्या उद्देशाने हे गावगुंड आले होते. या घटनेची माहीती शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप मोदे यांना मिळताच त्यांनी घटनास्थळी पथकासह धाव घेतली. पोलिस येताच यामध्ये सहभागी आरोपीं घटनास्थळावरून फरार झाले. याप्रकरणी ॲड रवींद्र सोनी यांच्या फिर्यादीवरून शहर पोलिस ठाण्यात आरोपी रामकिशन जैस्वाल याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून इतर अज्ञात सात ते आठ जणांविरूध्दही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी घटनास्थळी मोठी गर्दी जमली होती.

# हिंगोलीत सेवादूत प्रणालीचा पालकमंत्री झिरवाळ यांच्याहस्ते प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली १६ ऑगस्ट**



जिल्ह्यातील नागरिक व्हॉट्स अँप टेक्नोसेव्ही झाल्यामुळे त्यांना बदलत्या काळानुसार ऑनलाईन घरपोच सेवा मिळवून देण्यासाठी 'सेवादूत हिंगोली' प्रणाली व व्हॉटस्अप चॅटबोटच्या माध्यमातून शासन आपल्या दारी या अनोख्या उपक्रमाचा प्रारंभ पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित कार्यक्रमात झाला.

यावेळी व्यासपीठावर सर्वश्री आमदार तान्हाजी मुटकुळे, संतोष बांगर, राजू नवघरे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, सहायक जिल्हाधिकारी योगेश मीना, अपर पोलीस अधीक्षक कमलेश मीना उपस्थित होते.

राज्यात प्रथमच अनोख्या पद्धतीने घरबसल्या ऑनलाईनरित्या नागरिकांना सेवा पुरविण्यात येत असून, सद्यस्थितीत जिल्हा प्रशासनातील १३ विभागाच्या सेवा या प्रणालीतून पुरविण्यात येत आहेत. ही सेवा व्हॉट्स अँप व संकेतस्थळावर उपलब्ध असून, टप्प्याटप्प्याने सर्वच सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले. यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने दोन मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थींची सेवा घेतल्याचे ते म्हणाले.

हिंगोली जिल्हा प्रशासनाने सेवादूत प्रणालीतून 'शासन आपल्या दारी' उपक्रमास पालकमंत्र्यांच्या हस्ते सुरुवात केली. हा उपक्रम सुरु केल्याबद्दल पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांचे विशेष कौतुक करत अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सेवाही तात्काळ ऑनलाईन सुरु करण्याच्या सूचना दिल्या. तसेच सेवादूत उपक्रम राज्यातील इतरही जिल्ह्यात राबविणार असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.

ही सेवा व्हॉट्स अँप चँट बोट्स (९४०३५५९४९४) आणि संकेतस्थळावरही सुरू असून, नागरिकांना ऑनलाईन अर्ज करून कागदपत्रांसाठी आवश्यक पुराव्यांचीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे अर्जदाराचा वेळ आणि पैसा वाचणार असल्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले.

या उपक्रमाच्या माध्यमातून अर्जदार नागरिकांना हवी असलेली सेवा, लागणारी आवश्यक कागदपत्रे, ती सादर करण्यासाठी अपॉईंटमेंट घेण्याची वेळ आणि सेवा पुरविण्यासाठी शासनाने निर्धारित केलेले शुल्क याची माहितीही मिळणार असून ही माहिती भरल्यानंतर नोंदणीकृत आपले सरकार सेवा केंद्र चालक आपल्याला फोन करून आपण निवडलेल्या वेळेस व दिवशी आपल्या घरी येऊन आपण निवडलेल्या सेवेसाठी सर्व प्रक्रिया आपल्या घरीच पूर्ण करून घेतील तसेच निवडलेल्या सेवेसाठी लागणाऱ्या शुल्काची आणि कागदपत्रांची माहिती सुद्धा आपल्याला नोंदणी करत असतानाच मिळणार आहे. तेवढेच शुल्क आपणास आपल्या घरी येणाऱ्या आपले सरकार सेवा केंद्र धारकाला द्यावयाचे आहे. त्याचप्रमाणे आपण निवडलेली प्रमाणपत्रे शासनाच्या नियमानुसार तयार झाल्यानंतर आपल्या घरी तोच आपले सरकार सेवा केंद्राधारक घरपोच आणून देणार असल्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांना सांगितले.

# कल्याणकारी योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासन कटीबध्द- पालकमंत्री झिरवाळ

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ ऑगस्ट**

सर्वसामान्यांच्या हितासाठी शासन अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवित आहे. याचा लाभ सर्वसामान्य नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी शासन कटिबद्ध असून नवभारताचे स्वप्न साकारण्यासाठी भारतमातेची एकजुटीने सेवा करुयात, असे प्रतिपादन राज्याचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री तथा हिंगोलीचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी यावेळी केले.

भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. त्यावेळी पालकमंत्री श्री. झिरवाळ बोलत होते.

यावेळी मा. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष आमदार हेमंत पाटील, आमदार सर्वश्री. तान्हाजी मुटकुळे, संतोष बांगर, राजू उर्फ चंद्रकांत नवघरे, सर्वश्री माजी आमदार गजानन घुगे, रामराव वडकुते, संतोष टारपे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, सहायक जिल्हाधिकारी योगेश मीना, अपर पोलीस अधीक्षक कमलेश मीना, अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटूकडे यांच्यासह विभागप्रमुख, अधिकारी -कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार राज्यातील औंढा नागनाथसह पाच ज्योतिर्लिंगांच्या विकास आराखड्यांची प्रभावी आणि वेगाने अंमलबजावणी व्हावी, यासाठी पाच वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. श्रीक्षेत्र औंढा नागनाथ तीर्थक्षेत्र विकासासाठी वित्त विभागाच्या प्रधान सचिव तथा हिंगोलीच्या पालक सचिव श्रीमती रिचा बागला यांची नियुक्त करण्यात आल्या असून, या कामांचा अहवाल मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांना सादर करतील. औंढा नागनाथ ज्योतिर्लिंगाचा विकास आराखडा १५ कोटी रुपयांचा आहे. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील विविध कामांना गती मिळावी, ही कामे दर्जेदार आणि गतीने व्हावीत, यासाठी मंत्रालयीन स्तरावरून समन्वय, संनियंत्रणासाठी अधिकारी नियुक्तीचा निर्णय पहिल्यांदाच घेण्यात आला असल्याचे सांगून यावर्षीही जिल्ह्यात हर घर तिरंगाहे अभियान राबविण्यात आले असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.

सेवादूत हिंगोली ही वेब प्रणाली तसेच व्हाटस् अप चाटबोटच्या माध्यमातून नागरिकांना शासनाची हवी असलेली योजना, विविध कागदपत्रे सुलभरित्या घरपोच मिळणार आहे. तसेच लाईव्हबोर्ड सॉफ्टवेअर आणि मोबाईल अप्लिकेशन, से टू हाय- व्हॉटस्अप (८५४५ ०८ ८५४५) बेस तक्रार निवारण प्रणाली विकसित केली आहे. ही सेवा नागरिकांच्या समस्या जलद, पारदर्शक आणि सोयीस्कर पद्धतीने सोडविण्यात उपयोगात येणार असल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले. तसेच यावेळी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना, कृषी यांत्रिकीकरणाच्या विविध योजनेंतर्गत शेतकऱ्यांना कृषी व कृषीपूरक व्यवसायासाठी आवश्यक असणारी औजारे, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना, डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनाचा लाभ जिल्ह्यातील लाभार्थ्यांना देण्यात आल्याची माहिती दिली. तसेच मा. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे (हळद) हरिद्रा संशोधन व प्रशिक्षण केंद्रामार्फत हळदीच्या आधुनिक वाणाचे संशोधन व विस्ताराचे कार्य केंद्राच्या माध्यमातून तज्ज्ञांनी केलेल्या प्रयत्नामुळे 'वसमत हळद'या नावाने हिंगोलीच्या हळदीला भौगोलिक मानांकनाचा दर्जा मिळाला आहे.

हिंगोली येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कार्यान्वित झाले असून १०० विद्यार्थ्यांनी प्रवेशसुद्धा घेतल्याचे सांगितले. जिल्हा रुग्णालयात लवकरच हृदयरोग उपचारासाठी कॅथ लॅब कार्यान्वित होणार आहे. तसेच क्रिटिकल केअर ब्लॉक तसेच स्त्री रुग्णालय लवकरच रुग्णसेवेत सुरु होईल, असे सांगून गंभीर रुग्णांच्या अचूक निदानासाठी लवकरच एमआरआय सुविधा देखील उपलब्ध होणार असल्याचे पालकमंत्री श्री. झिरवाळ यांनी यावेळी सांगितले. जिल्हा रुग्णालयातील बालरोग विभागातील विभागासाठी मुस्कान प्रमाणपत्रमिळवणारा हिंगोली पहिला जिल्हा ठरला आहे. तर पोषण व पुनर्वसन केंद्र, बालरोग विभागास राज्य स्तरावरील द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. या केंद्रामुळे कुपोषित बालकास लाभ मिळणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



मागील वर्षी नैसर्गिक आपत्तीच्या नुकसानीपोटी डीबीटीद्वारे ३३३ कोटी १५ लक्ष वाटप तर चालू वर्षी जवळपास ४ कोटी रुपयाचा निधी वितरणाची कार्यवाही सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य योजनेंतर्गत हिंगोली जिल्ह्यात विविध योजना गरजू व पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यात येत आहेत. शासकीय वसतीगृह, निवासी शाळा, स्वाधार योजना, रमाई आवास घरकुल योजनांचीही माहिती त्यांनी दिली. शेतकऱ्यांना अखंडीत वीज पुरवठा करण्यासाठी पंतप्रधान कुसूम योजना व मागेल त्याला सौरकृषी पंप योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, ३३/११ केव्ही उपकेंद्राच्या देण्यात आलेल्या लाभाचीही माहिती त्यांनी यावेळी दिली.जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत ई-साक्ष चा वापर ग्रामीण भागात फक्त हिंगोली जिल्ह्यामध्ये यशस्वीरित्या राबविल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# नांदेड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध : पालकमंत्री अतुल सावे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ ऑगस्ट -**

केंद्र व राज्य शासनाच्यावतीने समाजातील सर्व घटकांसाठी विविध लोकाभिमुख योजना राबविण्यात येत आहेत. यात प्राधान्याने शेतकरी, सामान्यांच्या हिताच्या योजना राबविण्यावर भर देण्यात येत आहे. सर्वच क्षेत्रात नांदेड जिल्ह्याची वाटचाल प्रगतीशिल असून, जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी शासन सदैव कटिबध्द असल्याचे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे केले. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात बलिदान दिलेल्या सर्वांचे स्मरण करुन त्यांनी यावेळी भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.

भारताच्या ७९ वा स्वातंत्र्य दिन समारंभानिमित्त नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रागंणात आज पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. या समारंभास आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्य सैनिक त्यांचे वारसदार, माजी सैनिक, विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, विभाग प्रमुख, नागरिक, विद्यार्थी यांची मोठया प्रमाणात उपस्थिती होती.

देशात हर घर तिरंगा हा उपक्रम देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. या उपक्रमात नांदेडकरांनी उत्स्फूतपणे सहभाग घेतला. याबद्दल पालकमंत्री यांनी सर्वांचे आभार मानले. जिल्ह्यात पावसाची स्थिती चांगली असून पीक परिस्थिती समाधानकारक आहे. शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारची अडचण भासणार नाही याची दक्षता शासनाच्यावतीने घेतली जात असल्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी स्पष्ट केले.



जिल्ह्यात लेंडी प्रकल्पामुळे १५ हजार हे. क्षेत्र सिंचनाखाली येणार असून या कामाच्या घळभरणीचे काम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पासाठी भूसंपादन केलेल्या १९ गावांतील शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले आहे. जिल्ह्यात रोजगारासोबत उद्योग उभारणीला बळ दिले जात असून युवकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यावर भर देण्यात येत असल्याची माहिती अतुल सावे यांनी दिली.

जिल्ह्यात विविध विकास कामे प्रगतीपथावर असून विष्णुपूरी येथील ब्रीजचे काम व नवीन न्यायालयाच्या इमारतीचे कामही अंतिम टप्प्यात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यात ११२ प्रस्तावित सौर ऊर्जा उपकेंद्रापैकी ७० ठिकाणी १ हजार १५० एकर जमीन महावितरणला प्रदान करण्यात आली आहे. यासाठी जमिनीची उपलब्धता खूप कमी कालावधी जिल्हा प्रशासनाने केली. त्यामुळे पालकमंत्री अतुल सावे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रामुख्याने काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना त्यांच्या कामगिरीनुसार प्रोत्साहन व कार्यक्षमता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात जास्तीत जास्त प्रमाणात सहभाग नोंदवावा असे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

ध्वजारोहणानंतर सलामी देण्यात आली. सलामी पथक कमांडर पोलीस निरीक्षक विजयकुमार धोंडगे यांनी सलामी पथकाचे नेतृत्व केले. पोलीस दलाच्या सलामीनंतर राष्ट्रगीत, राज्यगीत नंतर पालकमंत्री अतुल सावे यांनी उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, त्यांचे कुटूंबिय यांची विचारपूस केली. वीरमाता, वीरभगीनी यांच्यासह या विशेष कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांना भेटून शुभेच्छा दिल्या. स्वातंत्र्य सैनिकांचे वारस आदीची उपस्थिती होती.

**राष्ट्रपती पदक व विशेष सेवा बजावलेल्या पोलीस अधिकाऱ्यांचा सत्कार**

पोलीस उपनिरीक्षक धोंडीबा माधवराव भुत्ते यांना राष्ट्रपती पदक घोषित झाल्याबाबत पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. तर पोलीस उपनिरीक्षक संकेत सवराते, शिवराज लोखंडे, महाजन राजेश्वर मैसनवार, शंकर धनाजीराव मोरे, अभिजीत गणेशराव तुतुरवाड, खंडु चांदु दर्शने यांना विशेष सेवेबाबत सत्कार करण्यात आला.

**अवयवदान केलेल्या कुटूंबियाचा सत्कार**

चंद्रकला प्रल्हाद रावळकर, भाग्यश्री संतोष मोरे, सोनाली भुजंग मस्के, लक्ष्मीबाई दादाराव पवळे, शोभा सूर्यकांत साधू, प्रिया अभिजीत ढोके, अरुणा विठ्ठल भुरके यांचा प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी पूर्व प्राथमिक राज्यस्तरीय शिष्यवृत्ती परीक्षा, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा, सीबीएससी गुणवंत विद्यार्थ्यांस पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

## संक्षिप्त वृत्त

### भारतीय जनता पार्टी जिल्हा उपाध्यक्ष पदी किशोर पा.लगळूदकर यांची फेर निवड



**भोकर**-मागील विस वर्षापासून लगळूद ग्रामपंचायतवर निर्विवाद वर्चस्व निर्माण केलेले भोकर बाजार समितीचे संचालक किशोर पा.लगळूदकर यांची भाजपा जिल्हाउपाध्यक्ष पदी फेर निवड करण्यात आली. किशोर पा.लगळूदकर हे गेली अनेक वर्ष सामाजीक कार्यात आग्रेसर असून लगळूद ग्रामपंचायत विस वर्षापासून त्यांच्या ताब्यात आहे त्यांनी गावात विकासात्मक कामे केली भोकर बाजार समितीचे संचालक म्हणून कार्यरत आहेत तसेच सेवा सहकारी सोसायटीवर देखील ताबा आहे.कै.सटवाजी पाटील कि.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आहेत यापूर्वी ते भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष पद सांभाळताना पक्षवाढीसाठी कार्य केले त्यांच्या कार्याची दखल घेवून माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकरावजी चव्हाण आ. श्रीजयाताई अशोक चव्हाण मराठवाडा संघटन मंत्री सजंय कौडगे जिल्हा अध्यक्ष किशोरजी देशमुख यांच्या प्रयत्नाने जिल्हा उपाध्यक्ष म्हणून किशोर पाटील यांची फेर निवड करण्यात आली. त्यांच्या निवडिबद्यल जगदीश पाटील भोसीकर गोविंद नागेलीकर, दिवाकर रेडी, बाळु माने निलेश देशमुख, गणेशराव कापसे, गणपतीराव पिटेवाड, संतोषराव मारकवार, अरुण डोईफोडे, वेणु कोंडलवार, माधव पवार, मँन्टी ऱ्याखावार आदिंनी अभिनंदन केले.

### बारड येथील स्वातंत्र्य सेनानी शाळेत स्वातंत्र्य दिवस उत्साहात साजरा

**मुदखेड**-स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड संचलित, स्वातंत्र्य सेनानी राजाराम बापू माध्यमिक शाळा व श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने ७९ वा स्वातंत्र्य दिवस अतिशय हर्ष उल्हासात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री संजय शंकररावजी देशमुख बारडकर तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष रमेशचंद्र महाजन, सचिव रामेश्वर कोरबनवाड, सहसचिव अशोक पाटील गव्हाणे ,कोषाध्यक्ष गौतम आठवले, संचालक एन.डी देशमुख, भगवान येवले, भगवान पाटील कांजाळे, गौतम आठवले, मारुती कांबळे, शाळेचे मुख्याध्यापक रामकिशन चुबेवार, महाविद्यालयाचे प्राचार्य हेमंत इंगळे, यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, पालक,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. प्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला सचिव रामेश्वर कोरबनवाड व कोषाध्यक्ष गौतम आठवले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कोषाध्यक्ष गौतम आठवले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी वर्ग ५ वी ते १० वीतील विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध भाषणे, देशभक्तीपर गीते सादर केली त्यामध्ये कीर्ती पवार,वैष्णवी कदम, मयुरी जकीलवाड, सुदर्शन कापावार,अनिकेत नरवाडे यांनी भाषणे व गीते सादर केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कू. राजनंदिनी व्यवहारे व कु. प्राची नादरे या विद्यार्थिनींनी केले तर आभार सहशिक्षक कैलास कपाटे सर यांनी व्यक्त केले.



### हिमायतनगर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**हिमायतनगर**- हिमायतनगर येथे म. फुले सभागृहात पेरकेवाड समाजाची जिल्हास्तरीय गुणवंत मुले व नोकरीस लागलेल्या युवकाचा गुणगौरव सोहळा २६ ऑक्टोबरला होणार आहे.त्यासाठी तालुकास्तरीय आढावा बैठक घेण्यात आली आहे.या आढावा बैठकीचे अध्यक्ष सेवानिवृत मुख्याध्यापक एन.के. अक्कलवाड होते. तर संयोजक गोविंदराव उल्लेवाड, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक संभाजी आलेवाड, अॅड. सुरेश पन्नसवाड, पो.नि. राजेश डाकेवाड, राजेश शिंगनवाड, मा.शिक्षक बालाजी सुब्बनवाड, प्रविण भुरेवार, सेवानिवृत मुख्याध्यापक अशोक अनगुलवार, माजी सरपंच बालाजी उल्लेवाड, मारोती बेरदेवाड, आदी होते. मान्यवराचा सत्कार हिमायतनगर तालुक्याच्या वतीने करण्यात आला. यावेळी जिल्हास्तरीय गुणवंताचा सत्कार व नोकरीस लागलेल्या विविध क्षेत्रातील युवकाचा गुणगौरव समारंभ २६ ऑक्टोबरला होणार असल्याने तालुकास्तरीय आढावा बैठक व निमंत्रण आदी विषय विस्तृत मार्गदर्शन संयोजक शासकीय गुतेदार गोविंदराव उल्लेवाड यांनी केले .या प्रसंगी मार्गदर्शनपर अॅड. सुरेश पन्नसवाड, पो.नि. राजेश डाकेवाड, बालाजी सुब्बनवाड, अशोक अनगुलवार आदीने मार्गदर्शन केले. यावेळी तालुक्यातील टेंभी, आंदेगाव, सवना ज. ,हिमायतनगर येथील पेरकेवाड समाज बांधव मोठ्या संखेने हजर होते. संचलन व अभार अशोक अनगुलवार यांनी मानले.




इस्लापुर- सहस्त्रकुंड धबधब्याने ओसंडून वाहत असुन धबधबा पाहण्यासाठी पर्यटकांची अलोट गर्दी होत आहे.

# आगळा वेगळा रक्षाबंधन; दीड हजार लाडक्या बहिणींनी मुस्लिम भावाला बांधल्या राख्या

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ ऑगस्ट -**



रक्षाबंधन हा अनोखा संदेश देणारा आगळा वेगळा सण आहे शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील आ.प्रताप पाटील चिखलीकर यांचे खंदे समर्थक माजी नगरसेवक करीमभाई शेख यांच्यावतीने कार्येक्रमाचे आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमात तब्बल दीड हजार लाडक्या बहिणींनी करीमभाई शेख यांच्यासह मुस्लीम भावांना राख्या बांधल्या बहिण भावाचे नाते आजुन दृढ व्हावेत यासाठी रक्षाबंधन भेट म्हणून बहिणींना साडी चोळी भेट दिली.

जुन्या लोह्यातील श्री गोरोबाकाका मंदिराच्या प्रांगणात हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगरसेविका शोभाताई बगाडे आणी सामाजिक कार्यकर्त्या सविता सातेगावे यांची उपस्थित होती. करिमभाई शेख म्हणाले लाडक्या बहिणींच्या मदतीसाठी मी सदैव तत्पर असल्याची ग्वाही दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवराज दाढेल यांनी केले. रक्षाबंधन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सलीम शेख, गौस पटेल, शेख अजमद, पद्माकर केंद्रे, बळी नागरगोजे, माधव ससाणे, संजय कदम, साहेल शेख आदींनी परिश्रम घेतले.

# हिमायतनगर तालुक्यात मुसळधार पाऊस

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १६ ऑगस्ट -**



हिमायतनगर तालुक्यातील मुसळधार पावसाने वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात दिनांक १६ ऑक्टोबर रोज शनिवारी सकाळ पासूनच पावसाने हजेरी लावली आहे. तब्बल तीन तासाहून अधिक वेळ चाललेल्या या पावसामुळे शहरातील सर्व भागाला पुराच्या पाण्याने वेडा घातल्याचे स्वरूप सध्या दिसून येत आहे. विजांच्या कडकडाटा सह शहरातील श्री परमेश्वर मंदिर मुख्य कमान , बाजार चौक सह सराफा लाईन परिसरात चक्क पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे अनेकांच्या घरात पाणी शिरून भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पावसाच्या पाण्याने शेतातील असलेल्या सोयाबीनमध्ये पाणी जमा झाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# रिसनगाव येथील वन जमिनीवर उद्यान उभारणार : आ. चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. १६ ऑगस्ट -**

लोहा तालुक्यातील रिसनगाव व परिसरातील वन विभागाच्या जमिनीवर वन उद्यान उभारणार असून यासाठी शासनाकडून १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार असल्याचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आढावा बैठकीत सांगून जनतेने मोठ्या संख्येने वृक्ष लागवड करावी असे आव्हान केले आहे.

रिसनगाव तालुका लोहा येथे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली वन विभागाची आढावा बैठक घेण्यात आली यावेळी उपवनसंरक्षक केशव वाबळे, सहाय्यक वनरक्षक खेलवाडे, वन परिमंडळ अधिकारी रासने,नायब तहसीलदार हाडगे, माजी उपनगराध्यक्ष दता वाले , माजी नगराध्यक्ष स्वप्निल लुंगारे, परिमंडळ अधिकारी हागदळे, वनरक्षक घुगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मुळीक, सार्वजनिक बांधकाम उप अभियंता मोहन पवार, जिल्हा परिषद बांधकाम उप अभियंता शिवाजी राठोड, वनरक्षक विजय मुंडे, माजी उपसभापती बालाजी कदम, सावरगाव मंडळ अधिकारी सूर्यवंशी मॅडम ग्रामसेवक रमेश राठोड यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी या आढावा बैठकीला उपस्थित होते.

आढावा बैठकीत आमदार चिखलीकर यांनी रिसनगाव व परिसरातील अन्य गावातील वन जमिनीवर वन उद्यान उभारण्यासाठी शासनाकडे दहा कोटी रुपये उपलब्ध करण्यासाठी प्रस्ताव दाखल करणार असून जिल्हा नियोजन समितीकडून पाच कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करून या ठिकाणी भव्य असे वन उद्यान उभारण्यात येणार आहे त्यासोबतच विविध प्राण्याची वाढ व्हावी यासाठी मोठ्या संख्येने वृक्ष लागवड करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा व त्याचे संगोपन करावे भविष्यात येथे मोठ्या प्रमाणात जंगल उपलब्ध झाल्यानंतर आजूबाजूचे पर्यटक देखील या ठिकाणी भेट देण्यात येतील आणि या भागाचा मोठ्या प्रमाणात विकास देखील होणार आहे. वनक्षेत्र वाढल्याने या भागात हिंस्त्र प्राण्यांचा आदिवास वाढेल आणि या भागात वाढणारे हरिण काळवीट नीलगाय रानडुक्कर यांच्या प्रजननावर आपोआपच नियंत्रण येईल त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान देखील होणार नाही

वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे सर्वांनी वेगवेगळ्या भागांमध्ये वृक्ष लागवड करण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आव्हान आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी यावेळी आढावा बैठकीत केले आहे. रिसनगाव परिसरातील वन विभागाच्या जमिनीवर दहा हजार विविध प्रकारचे झाडे लावण्याचा संकल्प माझ्याच पुढाकाराने घेण्यात आला होता त्यापैकी ५००० झाडे लावून त्या झाडाचे संगोपन करून वाढ करण्यात आलेली आहे यावेळी आमदार चिखलीकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

# पैनगंगेला पूर;धनोडा पूलावरून दोन फूट पाणी!

**तभा वृतसेवा**
**माहूर दि. १६ ऑगस्ट -**

तालुक्यात यावर्षी पावसाळा सुरू होताच अधूनमधून जोराचा तर एकसारखी सुरू झालेली पावसाची संततधार रिपरिप आज सकाळपासून शनिवारी विजांचा कडकडाट व वादळीवाऱ्यासह दुपारपर्यंत मुसळधार पावसात रुपांतरीत झाल्याने पैनगंगेला प्रचंड पूर आला. परिणामी धनोडा येथील पूलाच्या दोन फूट वरुन पाणी वाहू लागल्याने विदर्भ आणि मराठवाड्याचा संपर्क तूटून वाहतूक ठप्प झाली. नदिकाकाठची शेती पिकांसह खरडून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

यावर्षी जून महिन्यात मृग नक्षत्रापासूनच वरुणराजा काही वेगळ्याच मुढमध्ये असल्याचे दिसून येत आहे. पावसाची सारखी रिपरिप तालुक्यात सर्वत्र सुरू असल्याने शेतकऱ्यांच्या पाणी साचून



शेती चिबडल्या गेली. त्यात आज भरतीवर भर मोठा कहर या उक्तीप्रमाणे तालुक्यासह लगतच्या किनवट, हदगाव, हिमायतनगर, उमरखेड,पुसद, महागाव,आर्णी या सर्व तालुक्यात जोरदार मुसळधार पर्जन्यवृष्टी सुरू असल्याने विदर्भ मराठवाडा सिमेवरुन वाहणाऱ्या पैनगंगेच्या पात्रात मोठ्या प्रमाणात जलसाठा वाढू लागला, आणि सोबतच आज दि.१६ ऑगस्ट रोजी सकाळी ०९.०० वाजता इसापूर धरणाच्या सांडव्याची ३ वक्रद्वारे ५० सेंटिमीटर ने उघडण्यात आली असून सद्यस्थितीत पैनगंगा नदीपात्रात ४९८८ क्यूसेक्स (१४१.२२९ क्यूमेक्स )इतका विसर्ग सोडण्यात आला आहे.

परिणामी पैनगंगा नदीसह परिसरातील नाल्यांना प्रचंड पूर आला, नदी,नाले दोन्ही बाजूला दुथडी भरून वाहू लागले. धनोडा येथील पैनगंगेच्या पुलावरून दोन फूटापेक्षाही जास्त उंचीवरून पुराचे पाणी वाहू लागले. नदीकाठची रुई,हडसणी, केरोळी,शेकापूर,लांजी,नेर, लिंबायत,टाकळी,पडसा ह्या गावची नदीकाठच्या थडीच्या शेतात पूराचे पाणी घूसल्याने शेतकऱ्यांचे जोमात बहरलेली सोयाबीन, कापूस,तूर, मूग, उडीद ही खरीपाची उभी पिके जमीनीसह खरडून गेली. यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असून, शासनाच्या महसूल,कृषी व ग्रामविकास विभागाने त्वरित नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी,अशी आर्त हाक आर्थिक व मानसिक दृष्ट्या खचलेल्या बळीराजाने शासन, प्रशासनाला दिली आहे.

# गोकुळाष्टमी निमित्त खतगांवमध्ये शिवाजी पेटेकर यांची आकर्षक रांगोळी

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १६ ऑगस्ट -**

तालुक्यातील खतगांव येथे गोकुळाष्टमी चे औचित्य साधून येथील सहशिक्षक आणि कुशल रांगोळी कार शिवाजी पेटेकर यांनी अत्यंत आकर्षक व देखणी रांगोळी साकारली आहे. श्रीकृष्णाच्या जीवनातील विविध प्रसंग, जसे की बाललीला, गोवर्धन पूजा,रासलीला, इत्यादी दृश्ये त्यांनी कुशलतेने रेखाटली असून,रंगसंगती व बारकाव्यांनी सजवलेल्या या रांगोळीने खतगांवसह अन्य परिसरा तील ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले आहे.



ग्रामीण भागातील रांगोळीकार शिवाजी पेटेकरांनी गेल्या अनेक वर्षापासून हिंदू धर्मातील प्रत्येक सण, उत्सवांना केवळ धार्मिक नव्हे तर सांस्कृतिक सौंदर्यांने सातत्याने सजवण्याचे कार्य करीत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर यंदाच्या ही गोकुळाष्टमी निमित्त त्यांनी पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड देणारी रांगोळी साकारून,ग्रामीणभागात आपल्याकलेचा अनोखा ठसा उमटवला आहे. त्यांच्या या रचनात्मकतेचे गावातील नागरिक, विद्यार्थ्यांसह रसिकांकडून ही भरभरून कौतुक होत आहे.

रांगोळी कार शिवाजी पेटेकर यांच्या सारखे कला प्रेमीगावात असल्यामुळे,भारतीय संस्कृतीच्या परंपरे नुसार राज्यात साजरे केल्या जाणाऱ्या प्रत्येक सणाला एक सांस्कृतिक चैतन्य लाभते हे निश्चितच!

# सिडकोत स्वातंत्र्यदिनानिमित्त विविध ठिकानी ध्वजारोहण उत्साहात साजरा

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १६ ऑगस्ट -**

सिडको हडको परिसरात ७९ भारतीय स्वातंत्र्य दनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमासह शाळा, महाविद्यालय, ग्रामपंचायत कार्यालय येथे ठिकठिकाणी ध्वजारोहण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सिडकोतील मनपाचे क्षेत्रीय कार्यालय येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त उपायुक्त संधु महाराज व सहाय्यक आयुक्त मिर्झा बेग यांच्या हस्ते सकाळी ७ वाजता ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी कार्यालयीन अधीक्षक विलास गजभारे, वसुली प्रवेक्षक वसंत कल्याणकर, मारोती सारंग, संजय नागापूरकर, सादुल्ला खान, स्वच्छता निरीक्षक किसन वाघमारे, रुपेश सरोदे यांची उपस्थिती होती, तर सिडको कार्यालय सिडको प्रकल्प नवीन नांदेड येथे सहाय्यक विकास अधिकारी कपिल व्हि. राजपूत यांच्या हस्ते सकाळी ७:१५ वाजता ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी कार्यालयाचे लेखा सहाय्यक संकेत गिरी, यांच्यासह सुरक्षारक्षक सौ.लता पोहरे, राजू धुमाळ, बळी घंटेवाड, सुनील कांबळे, साईनाथ गिरी यांची उपस्थिती होती. तसेच महात्मा फुले माध्यमिक आश्रम शाळा वाघाळा येथील संस्थेचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक भगवान इंगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला यावेळी संस्थेचे सचिव सुहास इंगेवाड यांच्या सह शिक्षक शिक्षकतर कर्मचारीउ व विद्यार्थी यांची पस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीते गायली व स्वातंत्र्य दिनाची माहिती सांगणारे भाषण करून आपले मनोगत व्यक्त केले. तर त्याचप्रमाणे गोपाळचावडी ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी स्वातंत्र्यदिनानिमित्त ग्रामपंचायतचे सरपंच सौ. सुरेखा प्रदीप लाखे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ग्रामविकास अधिकारी प्रकाश भदरगे, उपसरपंच साहेबराव सेलुकर, सदस्य अशोक अंकुलवार, हनुमंत मैलगे, रमेश तालीमकर, छाया खटके, नितीन कंधारे, आशीर्वाद डाखोरे यांच्यासह जिल्हा परिषद शाळा गोपाळचावडी येथील शिक्षक व विद्यार्थी व ग्रामस्थांची उपस्थिती होती तर सिडकोतील कुसुमताई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे हर घर तिरंगा कार्यक्रमांतर्गत दिनांक १३ ऑगस्ट रोजी मुख्याध्यापक शशिकला जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला तर १४ ऑगस्ट रोजी प्राथमिकचे मुख्याध्यापक उषा कारामुंळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. तसेच दिनांक १५ ऑगस्ट रोजी स्वतंत्र दनानिमित्त संस्थेचे सचिव संभाजी बिरादार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती

